रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १५८
www.ramprahar.com

मंगळवार, २४ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'लाडकी बहीण'चा हफ्ता सात ते आठ दिवसांत मिळणार/२

'पालीकरांचा शुद्ध पाणी व बायपासचा प्रश्न सोडविणार'/५

पनवेलमधील विचुंबे येथे कुस्ती स्पर्धा रंगली/८

## शिक्षण मंत्रालयाकडून नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टात

**नवी दिल्ली :** इयत्ता पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करून पुढच्या इयत्तेत



प्रवेश देण्याचश धोरण केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने रद्द केले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टात आणली आहे. त्यामुळे आता पाचवी ते आठवीच्या वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करण्यात येणार आहे तसेच या विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देता येईल, मात्र पुन्हा अनुतीर्ण झाल्यास या विद्यार्थ्यांना पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. त्याचप्रमाणे कुठल्याही शाळेला इयत्ता आठवीपर्यंतच्या कुठल्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकता येणार नाही. मुलांमधील शिकण्याची क्षमता सुधारणे आणि शैक्षणिक कामगिरी उंचावणे हे हा निर्णय घेण्यामागचे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे सरकारने सांगितले आहे.

# राज्यात गरीबांसाठी २० लाख घरे

## केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांची घोषणा

**पुणे : प्रतिनिधी**

किसान सन्मान दिवसानिमित्ताने सोमवारी (दि. २३) पुण्यातील केंद्र सरकारच्या कृषी विज्ञान केंद्रात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला केंद्रीय कृषी व ग्रामविकासमंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या वेळी ना. चौहान यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी पंतप्रधान आवास योजनेंतर्गत १९ लाख ६६ हजार घरे या वर्षी देण्यात येणार असल्याची घोषणा केली.

केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतासाठी देवाचे वरदान आहेत, तर देवाभाऊ महाराष्ट्राच्या जनतेचे जीवन बदलण्यासाठी मुख्यमंत्री झाले आहेत. फडणवीस माझे छोटे भाऊ आहेत, तर मी महाराष्ट्राचा जावई आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत.



आधीचे कृषीमंत्री असताना २३ हजार बजेट होते, ते आता एक लाख २७ हजार कोटी रुपये आहे. मी ग्रामविकासमंत्रीदेखील आहे. प्रत्येक गरिबाकडे स्वतःचे पक्के घर असले पाहिजे हा प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आमचा प्रयत्न आहे. तिसऱ्यांदा मोदी सरकार निवडून आले आहे. ज्यांना यापूर्वी घर भेटले नाही, त्या सर्वांना स्वतःचे घर भेटणार आहे. ज्यांच्याकडे दोन चाकी गाडी आहे, त्यांनाही प्रधानमंत्री आवास योजनेतून घर मिळेल.

### मुख्यमंत्री फडणवीसांकडून मोदी सरकारचे आभार

प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारच्या वतीने महाराष्ट्रातील गरिबांकरिता, कच्च्या घरात राहणाऱ्या बेघरांसाठी एका वर्षात २० लाख घर देण्याची घोषणा केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलेली आहे. महाराष्ट्राला मोदी सरकारने दिलेली अत्यंत मोठी भेट आहे. त्याचबरोबर पूर्वी जे निकष होते, त्यातील काही शिथील करण्यात आले आहेत. ज्यांची नावे सुटली होती, जे खरे बेघर आहेत अशा सर्वांना नव्या सर्वेक्षणात घरे देण्यात येतील. पुढील पाच वर्षांमध्ये सर्व बेघरांना घरे देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. इतक्या संख्येने राज्याला घरे देण्याच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री चौहान यांचे आभार मानले.

# रामबागचा वर्धापन दिन उत्साहात साजरा; मान्यवरांची उपस्थिती

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांचा सत्कार



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : हरेश साठे**

महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि लाखो निसर्गप्रेमींनी भेट दिलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील रामबाग या अतिसुंदर उद्यानाचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा हजारो नागरिकांच्या साक्षीने रविवारी (दि. २२) सायंकाळी मोठ्या उत्साहात साजरा झाला.

नयनरम्य वातावरण, आकर्षक विद्युत रोषणाई, उत्तम नियोजन आणि लहानग्यांपासून युवक, महिला, ज्येष्ठांच्या उपस्थितीने रामबाग नंदनवनाप्रमाणे फुलली होती. अशा वेळी पारंपरिक आगरी–कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने वातावरणात स्फूर्ती आणली. स्वतःच्या



संपत्तीतून लोकांच्या सेवेसाठी उभारलेली रामबाग ही वास्तू न्हावे पंचक्रोशीतच नव्हे; तर पनवेल, उरण, रायगड नवी मुंबईसाठी अभिमानाची ठरली आहे. विशेष म्हणजे रामबाग आता पर्यटनस्थळ म्हणून उदयास आली आहे. त्यामुळे न्हावे व पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि म्हसेश्वर मंदिर समितीच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृदय सत्कार करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यात आला. त्याचप्रमाणे विधानसभा निवडणुकीत विजयी चौकार मारणारे आमदार प्रशांत ठाकूर आणि पुन्हा एकदा विजयी मिळवलेले आमदार महेश बालदी यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यात प्रमुख मान्यवर म्हणून कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य रवींद्र पाटील, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, सरपंच विजेंद्र पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### परिसराच्या विकासासाठी कार्यरत राहू –आमदार प्रशांत ठाकूर

आपल्या सर्वांचे मार्गदर्शक लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली म्हसेश्वर देवस्थान कमिटीच्या माध्यमातून हा सगळा परिसर सुशोभित झाला. न्हावेखाडी गावाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून रामबाग हे आपल्या सर्वांना अभिमान वाटणारे अशा पद्धतीचे एक सौंदर्यस्थळ, पर्यटनस्थळ ठरलेले आहे, असे उद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी काढले. आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रचंड वेगाने बदलतोय. आपला परिसरसुद्धा बदलत असताना या परिसरामध्ये आपल्याला अपेक्षित विकास घडवण्यासाठी आम्ही काम करत राहू, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

## पुण्यात डम्परने नऊ जणांना चिरडले; तिघांचा मृत्यू, सहा गंभीर जखमी

**पुणे : प्रतिनिधी**

अमरावतीवरून कामासाठी पुण्यात आलेल्या नऊ जणांना पुण्यात वाघोली केसनंद परिसरात डम्परने चिरडल्याची घटना सोमवारी (दि. २३) रात्री बारा ते १ वाजण्याच्या सुमारास घडली. यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

पुण्यात काम शोधण्यासाठी आलेल्या या कामगारांनी फुटपाथवर आसरा घेतला होता. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या डम्परचालकाने फुटपाथवर



झोपलेल्या नऊ जणांना चिरडले. मृतांमध्ये विशाल विनोद पवार (वय २२), वैभवी रितेश पवार (वय १), वैभव रितेश पवार (वय २) यांचा समावेश आहे, तर जानकी दिनेश पवार (वय २१), रिनिशा विनोद पवार (वय १८), रोशन शशादू भोसले (वय ९) नगेश निवृत्ती पवार (वय २७), दर्शन संजय वैराळ (वय १८), आलिशा विनोद पवार (वय ४७) जखमी आहेत. जखमी कामगारांवर सध्या ससून रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. या अपघातप्रकरणी पोलिसांनी डम्परचालक गजानन शंकर तोट्रे (वय २६, रा. नांदेड) याला अटक केली असून त्याच्या विरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निर्माते व दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रसिद्ध चित्रपट निर्माते व दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचे सोमवारी (दि. २३) निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. मुंबई सेंट्रल येथील वोकार्ट हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

बेनेगल बऱ्याच काळापासून क्रोनिक किडनीच्या समस्येने ग्रस्त होते. ते या आजाराच्या शेवटच्या टप्प्यात पोहचले होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

## निवडक

### पूजा खेडकरचा अटकपूर्व जामीन हायकोर्टाने फेटाळला

**नवी दिल्ली :** बडतर्फ प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर हिचा अटकपूर्व जामीन अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. खेडकरने केलेली फसवणूक ही केवळ त्या संस्थेची फसवणूक नसून संपूर्ण समाजाची फसवणूक आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. ऑगस्टमध्ये पूजाला अंतरिम संरक्षण मिळाले होते, मात्र आता तिच्यावर अटकेची टांगती तलवार आहे.

### विनोद कांबळीची तब्येत बिघडली, रुग्णालयात दाखल

**ठाणे :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी फलंदाज



विनोद कांबळी याची प्रकृती अचानक बिघडली आहे. त्याला भिवंडीतील आकृती रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोशल मीडियात याबाबतचे फोटो व्हायरल झाले आहेत. सध्या तो ठीक दिसत असला तरी त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे म्हटले जात आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईतील एका कार्यक्रमात तो विमनस्क अवस्थेत दिसला होता.

## मंत्री आदिती तटकरे यांचे कळंबोलीत जोरदार स्वागत

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिल्या शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांचे सोमवारी (दि. २३) कळंबोली येथे जोरदार स्वागत करण्यात आले.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंत्री तटकरे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात श्रीवर्धन मतदारसंघाच्या आमदार आदिती तटकरे यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर झालेल्या खातेवाटपामध्ये त्यांना पुन्हा एकदा महिला व बालकल्याण विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. दरम्यान, त्या सोमवारी कळंबोलीत आल्या असता त्यांची मिरवणूक काढून जोरदार स्वागत करण्यात आले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस चारुशीला घरत, संध्या शारबिद्रे, माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, प्रमिला पाटील, दर्शना भोईर, मोनिका महानवर, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी जि.प. सदस्य वैजनाथ ठाकूर तसेच विद्या तामखडे, राष्ट्रवादीचे नेते शिवदास कांबळे, पनवेल जिल्हा अध्यक्ष महादेव पाटील, तालुका अध्यक्ष हाबिब शेख, आदेश पाटील, विलास करतमोड आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## जनतेची सेवा हाच सत्कार –मंत्री गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपचे नवी मुंबईतील ज्येष्ठ नेते आमदार गणेश नाईक यांची कॅबिनेट मंत्रिपदी नियुक्ती झाली आहे. त्यांच्याकडे वनखाते देण्यात आले आहे. त्यांनी जनतेची सेवा हाच माझा सत्कार असल्याच्या भावना व्यक्त केल्या असून कोणत्याही प्रकारचा जाहीर सत्कार ते स्वीकारणार नाहीत, परंतु जनतेचे प्रश्न, अडीअडचणी आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी लवकरच जनता दरबार उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर वनमंत्री गणेश नाईक यांचे रविवारी (दि. २२) नागपूरवरून नवी मुंबईत आगमन झाले. या वेळी त्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून जंगी स्वागत करण्यात आले. ना. नाईक यांनी सर्वप्रथम ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात जाऊन अभिवादन केले. यानंतर वाशी येथील छत्रपती शिवाजी



महाराजांच्या पुतळ्यालाही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना ना. गणेश नाईक म्हणाले की, १९९५मध्ये मी वनखात्याचा मंत्री होतो. हे खाते सांभाळण्याचा पाच वर्षांचा अनुभव आहे. वनसंपदा वाढवून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी अधिकच्या सुधारणा आणि योजना राबविण्यात येतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माझ्यावर विश्वास ठेवून जी जबाबदारी दिलेली आहे ती पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न राहील.

या वेळी माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, सुधाकर सोनवणे, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी स्थायी समिती सभापती अनंत सुतार, संपत शेवाळे, युवा नेते संकल्प नाईक यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल, उरणमधील रेल्वे प्रवाशांच्या समस्या मार्गी लावणार

## महाप्रबंधक धरम वीर मीना यांचे आश्वासन



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल, उरणमधील रेल्वेशी संबंधित समस्या ३१ जानेवारी २०२५पर्यंत मार्गी लावणार असल्याचे आश्वासन महाप्रबंधक धरम वीर मीना यांनी भाजपच्या शिष्टमंडळाला दिले आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी विधानसभा निवडणुकीत उरण येथील सभेत पनवेल, उरणमधील रेल्वेच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी महाप्रबंधक धरम वीर मीना यांच्यासोबत बैठक आयोजित करण्याचा शब्द दिला होता. दिलेला शब्द रेल्वेमंत्र्यांनी पूर्ण केला असून त्यांच्या आदेशानुसार भाजप शिष्टमंडळाची मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे महाप्रबंधकांसोबत सोमवारी (दि. २३) बैठक झाली. या वेळी उरणचे आमदार महेश बालदी यांनी रेल्वेशी निगडीत विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

आमदार प्रशांत ठाकूर स्थानिक कार्यक्रमांमध्ये व्यस्त असल्याने त्यांनी पनवेलमधील समस्या निवेदनामार्फत महाप्रबंधकांकडे पोहचवल्या. यामध्ये पनवेल रेल्वेस्थानकावरील सर्व फलाटांवर सकरते जिने (एक्सलेटर) बसवावेत, फलाट क्रमांक १ ते ४मधील भुयारी मार्ग पनवेल पूर्वेपर्यंत वाढवावा, सध्या अस्तित्वात असलेला फूट ओव्हर ब्रिज प्रवाशांच्या वाढत्या संख्येला सामावून घेण्यासाठी पुरेसा नाही; त्यामुळे नवीन रूंद फूट ओव्हर ब्रिजची गरज आहे; अपंग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिला यांच्यासाठी प्रत्येक प्लॅटफॉर्मवर लिफ्टची आवश्यकता आहे तसेच वाढती वाहने लक्षात घेऊन स्थानकाबाहेर पार्किंगची पुरेशी व्यवस्था करावी, अशा मागण्या आहेत. **(पान २ वर..)**

## खातेवाटपानंतर बंगल्यांचेही वाटप

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर शनिवारी मंत्र्यांचे खातेवाटप झाले. खातेवाटपानंतर आता मंत्र्यांना मंत्रालयातील दालनाचे आणि दालनापाठोपाठ सरकारी बंगल्यांचेही वाटप करण्यात आले.

यामध्ये विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना ज्ञानेश्वरी हा बंगला देण्यात आला असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवगिरी बंगल्याची चावी मिळाली आहे. महायुतीच्या ३१ मंत्र्यांना बंगल्याचे वाटप करण्यात आले असून गत बहुतांश मंत्र्यांना त्यांचेच बंगले देण्यात आल्याचे यादीवरून दिसून येते. महायुती सरकार एक एक पाऊल पुढे टाकत असून आता केवळ पालकमंत्रिपदांचे वाटप बाकी आहे.

## राहुल गांधींनी विद्वेषाचे काम केले

### परभणी दौऱ्यावरून मुख्यमंत्र्यांची टीका



**पुणे : प्रतिनिधी**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी (दि. २३) परभणीत येऊन सोमनाथ सूर्यवंशी याच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या वेळी त्यांनी मागासर्वगीय असल्यानेच पोलिसांनी सोमनाथची हत्या केली, असा आरोप केला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

राहुल गांधी हे केवळ राजकीय हेतूने परभणीत आले होते. ही त्यांची राजकीय भेट होती. गेली अनेक वर्षे ते लोकांमध्ये, जाती जातीत भेद निर्माण करायचे काम करत आहेत. त्यामुळे मला असे वाटते की त्यांनी परभणीत जाऊन विद्वेषाचे काम केले. आमचे सरकार संवेदनशील असल्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे. न्यायालयीन चौकशीत संपूर्ण सत्य बाहेर येणार आहे. कुठल्याही आरोपीला सोडण्यात येणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, ज्येष्ठ नेते शरद पवार हेदेखील परभणी येथे गेले होते. पवारसाहेबांनी मला एवढेच सांगितले की, या दोन्ही ठिकाणी तुम्ही लक्ष घाला आणि मी त्यांना सांगितले मी दोन्ही ठिकाणी लक्ष घातले आहे. मुख्यमंत्री पुणे दौऱ्यावर होते. कृषी तंत्रज्ञान अनुपयोग संशोधन संस्था येथे शेतकरी व ग्रामीण विकास लाभार्थी संमेलनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

# 'लाडकी बहीण'चा हफ्ता सात ते आठ दिवसांत मिळणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता पुढील सात ते आठ दिवसांत देण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना दिली आहे.



माजी लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? याबाबत प्रश्न विचारले जात आहेत. या पार्श्वभूमीवरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना याबाबत मोठे भाष्य केले. लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? असा प्रश्न मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, 'लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता पुढील सात ते आठ दिवसांत देण्यात येणार आहे, दरम्यान विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांच्या हप्त्यात वाढ करून २१०० रुपये करण्यात येतील, अशी घोषणा केली होती. मात्र, आता सरकार स्थापन होऊन एवढे दिवस झाले तरी लाडक्या बहिणींना डिसेंबरचा हप्ता मिळालेला नाही. यातच डिसेंबरचा हप्ता लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळणार की २१०० रुपये मिळणार? हे देखील अद्याप स्पष्ट करण्यात आलेलं नाही. डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? आणि नेमकं किती मिळणार? याबाबत 'लाडक्या बहिणी'मध्येही संभ्रम असल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेमध्ये विविध विषयांची माहिती देताना लाडकी बहिण योजनेसंदर्भात महत्त्वाची घोषणा केली. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने अनेक योजना जाहीर केल्या होत्या. या योजनांची पूर्तता करण्यासाठी ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली होती.

# रेल्वे फाटकातून गाडी पुढे काढण्याच्या वादातून मारहाण

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील भिवपुरी रोड रेल्वेस्थानकाच्या पुढे चिंचवली गावात असलेल्या रेल्वे फाटकात गाड्या अडकून पडल्या होत्या. त्यावेळी गाडी काढण्याच्या वादातून संवाद येथील अनिल भोसले यांना चार जणांनी मारहाण केली. या मारहाणीत रक्तबंबाळ झालेल्या अनिल भोसले यांची रुईग्णालयात जाऊन तक्रार घेण्यात आली आणि यांनंतर नेरळ पोलिसांनी गुन्हा दाखल करून एका तरुणाला अटक केली.

शेळके हॉल किरवली येथे लग्न समारंभासाठी गेलेले अनिल अनंत भोसले हे आपली मूळ गावी सलवाड येथे जाण्यासाठी मध्य रेल्वेवरील चिंचवली फाटक येथून जात होते. सायंकाळी साडे सात वाजता फाटकात झालेल्या वाहतूक कोंडीमध्ये त्यांची आणि अन्य कार चालक यांच्यात गाडी पुढे मागे करण्यावरून बाचाबाची झाली. यावेळी गाडीतील इतर दोन इसम यांनी गाडीतुन उतरून अनिल भोसले यांच्या गाडीचे दरवाजा आणि काचेवर हाताने जोर जोरात मारण्यास सुरुवात केली. अनिल भोसले यांनी आपल्या गाडीच्या काचा खाली घेतल्या त्यावेळी आरोपी तरुणांनी त्यांना हाताचे ठोसे दिले. त्याचवेळी गाडी चालक याने चॉपरचे चपट्या बाजुने अनिल भोसले यांना मारहाण केली आणि त्यामुळे त्यांचे चेहऱ्यावर नाकावर आणि डोळ्याचे जवळ गंभीर दुखापत झाली.

नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे . रात्री अकरा वाजता मारहाण करणाऱ्या एका तरुणाला ताब्यात घेतले असून अन्य तिघांचा शोध सुरु आहे.या प्रकरणी २४७ / २०२४ खाली भारतीय दंड संहिता ११८/२, १२६/२, १८९/२, १९१/२, १९०, ३५२ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे काळं ३७/१, ३,१३५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

# राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणासाठी क्षेत्रीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने घरेलू सामाजिक वापर आरोग्य आणि संपूर्ण मॉड्यूल सर्वेक्षण टेलिकॉम या आगामी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणासाठी क्षेत्रीय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते.



या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन सुप्रिया रॉय, उपसंचालक एनएसओ, मुंबई यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी डॉ. सचिन गायकवाड, शास्त्रज्ञ आनंद एस लाधे, आर. पी. थोटे, एस.सी. लाढे,के. राजगोपाल, एच. वी. रभडिया उपस्थित होते.

भारतीय सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अंतर्गत घरेलू सामाजिक वापर: आरोग्य आणि संपूर्ण मॉड्यूल सर्वेक्षण टेलिकॉम या ८० व्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाची सुरुवात १ जानेवारी २०२५ पासून देशभर करण्याची घोषणा केली आहे. मुंबईच्या एनएसओ फील्ड ऑपरेशन डिव्हिजनने महाराष्ट्र वेस्ट क्षेत्रासाठी सीजीओ कॉम्प्लेक्स, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई येथे २३ डिसेंबर २०२४ पासून चार दिवसीय क्षेत्रीय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे.

एनएसओ आणि राज्याच्या अर्थसांख्यिकी आणि सांख्यिकी संचालक कार्यालये एकत्रितपणे आरोग्य संबंधित सर्वेक्षण १ जानेवारी २०२५ पासून एक वर्षासाठी सुरू होईल. सर्वेक्षण जानेवारी ते मार्च २०२५ दरम्यान एनएसओकडून आयोजित केले जाणार आहे.

यावेळी सुप्रिया रॉय यांनी आरोग्य संबंधित सर्वेक्षण डेटाच्या महत्त्वावर भाष्य केले. या सर्वेक्षणाचे उद्दिष्ट देशाच्या विविध भागांतील रोगाची दर, सार्वजनिक आणि खासगी आरोग्य सेवा वापरण्याचा प्रमाण, बाह्य खर्च आणि सरकारी आरोग्य विमा योजनांचा उपयोग, संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण इत्यादींबाबत माहिती संकलित करणे आहे.

संपूर्ण मॉड्यूल टेलिकॉम सर्वेक्षण टेलिकॉम संबंधित निर्देशक आणि आयसीटी कौशल्यावर आधारित माहिती प्रदान करेल. संकलित केलेले डेटा मंत्रालयांद्वारे जागतिक निर्देशांकाच्या अहवालासाठी वापरले जाईल. सार्वजनिक सहकार्य आवश्यक असून, जनतेला सुसंस्कृतपणे आणि धैर्याने मुलाखत घेणाऱ्याला योग्य उत्तर देण्याची आवश्यकता आहे असे त्या म्हणाल्या.

डॉ. सचिन गायकवाड, मुख्य वैद्यकीय अधिकारी, हे मुख्य अतिथी होते. त्यांनी आरोग्य संबंधित सर्वेक्षणाचे महत्त्व देशाच्या समग्र विकासासाठी अधोरेखित केले.आनंद एस लाधे, शास्त्रज्ञ-फ, एनआयसी हे अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी टेलिकॉम संबंधित निर्देशक आणि आयसीटी कौशल्याचे महत्त्व विशद केले.

# 'जीनियस जेम डॉ. जीएम' पुस्तकाचे प्रकाशन



**ठाणे : प्रतिनिधी**

लेखिका अनुराधा परब लिखित आणि विनायक परब संपादीत प्रगतिशील उद्योगपती व सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ डॉ. गंगाधर मोतीराम वारके अर्थात डॉ.जीएम यांचे कार्यचरित्र 'जीनियस जेम डॉ जीएम' या पुस्तकाचे प्रकाशन रोहन प्रकाशन व आयोजक अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने ठाण्यातील ईबिस हॉटेलच्या सभागृहात नुकतेच झाले.

प्रवचनकार डॉ. सच्चिदानंद शेवडे या वेळी म्हणाले की, आजकाल नकार ऐकण्याची सवय नसल्यानेच तरुणाईमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढीस लागले आहे. तेव्हा, कितीही संकटे आली तरी खचून जाऊ नका. हाच संदेश जीनियस जेम डॉ. जीएम या कार्यचरित्रामधून तरुणाईला दिला आहे. हे एका माणसाचे चरित्र नसून तरुणाईसाठी आदर्श व मार्गदर्शनपर असे पुस्तक आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद्मभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी यांच्यासह प्रसिद्ध लेखिका डॉ उज्वला दळवी, रोहन प्रकाशनचे रोहन चंपानेरकर, प्रा. लक्ष्मण भोळे, यजुवेंद्र महाजन, डॉ विशाल वारके, उत्सवमूर्ती डॉ. गंगाधर वारके, कार्यचरित्राच्या लेखिका अनुराधा परब यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी पद्मभूषण डॉ. जेष्ठराज जोशी, पद्मश्री सुधारक ओलवे, दीपस्तंभचे यजुवेंद्र महाजन, डॉ. उज्वला दळवी, डॉ.गिरीश ब.महाजन, डॉ. अरविंद देशमुख, डॉ. सुहास वारके, रोहन चंपानेरकर, हायमिडियाच्या आयटी हेड सरोज वारके, डॉ. विशाल वारके, डॉ. राहुल वारके, डॉ. प्रीती वारके, डॉ. श्वेता वारके, मार्केटिंग डायरेक्टर व्ही एम वारके, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार वासुदेव कामत, पद्मश्री सुधारक ओलवे, डॉ. विजय कदम, हेमंत नेहते आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ. योगेश जोशी आणि अनुया धारप यांच्या सुत्रसंचालन केले. प्रास्ताविक डॉ. गिरीश महाजन यांनी केले तर आभार डॉ. श्वेता वारके यांनी मानले.

# डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात राष्ट्रीय गणित दिवस साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात १८ ते २१ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा करण्यात आला भारताचे महान गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती निमित्त २२ डिसेंबर हा विशेष दिन साजरा करण्यात आला.



या दिनाचे औचित साधून या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल प्रा. डॉ. कारभारी काळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाले कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. आदिती फडके, गणित विभाग नौरोसजी वाडिया कॉलेज पुणे या उपस्थित होत्या. त्यांनी गणिताच्या क्षेत्रातील रामानुज यांच्या योगदानाबद्दल आणि त्यांच्या महत्त्व बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. डॉ. संजय नलबलवार, संशोधन आणि विकास अधिष्ठाता प्रा. डॉ. सचिन पोरे, इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. अमित शेष आणि गणित विभाग समन्वयक प्रा.रवींद्र सोनवणे उपस्थित होते.

विविध स्पर्धा आणि कार्यशाळांचे सुयोग्य आयोजन करण्यात आले होते यामध्ये गणितीय कोडी सोडवणे, तर्क शक्ती चाचण्या तसेच पोस्टर प्रदर्शनाचा समावेश होता. स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विजेत्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी जागृतकता आणि प्रेम निर्माण व्हावे तसेच बौद्धिक विकासाला चालना मिळावी या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. राखी ओक, प्रा. सुरज शेलार, प्रा.अभिजीत पोटे, प्रा. आकाश जाधव आणि प्रा. ज्ञानेश्वर सुरवसे, प्र. सा. जितेंद्र अंधेरे, लक्ष्मण कोर्पे त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते

## जप्त वाहनांचा होणार लिलाव

**नवी मुंबई : बातमीदार**

विविध गुन्ह्यात एनआरआय पोलिसांच्या जप्तीत असलेल्या १२ वाहनांचा लिलाव केला जाणार आहे. २०१५ सालापासून ही वाहने एनआरआय पोलिसांच्या ताब्यात आहेत. यामुळे जागा अडून राहत असल्याने त्यांचा लिलाव करण्याची पोलिसांनी न्यायालयाकडे अनुमती मागितली असता न्यायालयाने ती मान्य केली आहे.

एनआरआय पोलीस ठाण्याच्या आवारात जप्तीतली वाहने पडून आहेत. त्यात १२ वाहने ही २०१५ सालापासून पोलिसांच्या ताब्यात आहेत. त्यात कार, दुचाकी अशा वाहनांचा समावेश आहे. वेगवेगळ्या गुन्ह्यात पोलिसांनी ही वाहने जप्त केलेली आहेत. परंतु, अद्यापपर्यंत संबंधित वाहन मालकांनी त्यांचा ताबा घेतलेला नाही. यामुळे वाहनांची झीज होऊन त्यांची भंगार अवस्था झाली आहे. त्यामुळे न्यायालयाच्या अनुमतीने या वाहनांचा लिलाव केला जाणार आहे.

पान १ वरुन

## रामबागचा वर्धापन दिन उत्साहात साजरा; मान्यवरांची उपस्थिती

वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्री सत्यनारायण महापूजेचे हजारो नागरिकांनी दर्शन तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला. या वेळी पंचम निर्मित व गणेश भगत प्रस्तुत सुप्रसिद्ध अभिनेते पंढरीनाथ अर्थात पॅडी कांबळे आणि सोबत ७० कलाकारांचा संच असलेला 'महाराष्ट्राचे आम्ही मराठी' या पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने रंगत आणली.

रामबागला भेट देणाऱ्यांना मनोमन समाधान आणि त्यांच्या चेहऱ्यावर मनमुराद आनंद दिसतो. न्हावेखाडीत रामबागच्या रूपाने कमळ उमलले आणि याचा उपयोग संपूर्ण परिसराला होत असून त्यामुळे या परिसराला आणखी एक चांगली ओळख मिळाली. राज्यातून विविध भागातील लोकं या ठिकाणी आवर्जून भेट देत आहेत. अनेक उद्यानांना प्रवेश फी आकारली जाते, मात्र रामबागेत प्रवेश विनाशुल्क आहे. या ठिकाणी प्रवेश मोफत असला तरी सुविधा दर्जेदार आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी स्वर्गसुखाचा आनंद देणारी म्हणून रामबाग ओळखली जात आहे.

वर्धापन दिन सोहळ्याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, माझगाव डॉकचे जीएम श्री. सांळुखे, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, चिंतामण घरत, रामदास ठाकूर, न्हावे उपसरपंच शैलेश पाटील, गव्हाण उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका सुशीला घरत, दर्शना भोईर, प्रमिला पाटील, कल्पना ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, मदन ठाकूर, हरेश्वर कडू, प्रकाश कडू, अरुणशेठ ठाकूर, वैभव म्हात्रे, अमर म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह ठाकूर कुटुंबिय, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचे श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर, रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर व पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. या वेळी स्वप्नील ठाकूर यांनी स्वागतपर भाषणात रामबाग निर्मितीमागचे उद्दिष्ट विषद केले. हे उद्यान न्हावे पंचक्रोशीच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण, अभिमानास्पद व पर्यावरणप्रेमी स्थळ असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांच्या नेतृत्वाखाली या ठिकाणी कमिटीच्या सर्व सदस्यांनी, ग्रामस्थांनी दिलेल्या योगदानाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे मनापासून अभिनंदन व आभार व्यक्त करून म्हटले की, आज या आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याच्या बनलेल्या रामबाग परिसराला पाहता पाहता दोन वर्ष झाली आहेत आणि त्या माध्यमातून आपण सगळेच जण एकमेकांशी अधिकाधिक जोडले जातोय. या ठिकाणी होणारे वेगवेगळ्या पद्धतीचे सांस्कृतिक कार्यक्रम हीसुद्धा आता रामबागची एक खासन वेगळी अशी ओळख बनत चाललेली आहे. त्यामुळे हा परिसर आपल्या उलवेचीच नाही तर एका अर्थाने पनवेल तालुक्याची शान बनत चाललेला आहे आणि त्यामुळे निश्चितच आपल्या सगळ्यांचा आनंद हा अधिकाधिक वाढला आहे.

वेगवेगळ्या मार्गाने या परिसराच्या विकासासाठी कै. जनार्दन भगतसाहेब यांच्यापासून प्रेरणा घेत लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांच्या नेतृत्वाखाली आपण सारी मंडळी काम करतो. स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी यांना अभिमानाने इथं आपले जीवन जगता आले पाहिजे. पुढच्या पिढीला त्यांना चांगल्या पद्धतीने इथे विकासाचा होतोय व त्या विकासामध्ये महत्त्वाचं स्थान मिळालं पाहिजे यासाठी जे जे करण आवश्यक आहे ते करण्यासाठी रामशेठ ठाकूरसाहेबांच्या नेतृत्वाखाली आपण प्रयत्न करतो. मग इथे विमानतळ येतंय, जेएनपीटीचे चार चार पोर्टस् आलेले आहेत किंवा या परिसराचा होणारा हा जो विकास आहे यामध्ये विकासाच्या, रोजगाराच्या-स्वयंरोजगाराच्या अनेक संधी नव्याने निर्माण होतात आणि या नव्याने निर्माण होणाऱ्या या संधी आपल्या तरुणांना मिळाल्या पाहिजेत. आपल्या परिसरात राहणारा ग्रामस्थ, नवयुवक यांना कुठल्याही स्थितीमध्ये रोजगारासाठी इथून कुठे जावे लागू नये. देशभरातून वेगवेगळे तरुण आपले नशीब आजमावण्यासाठी मुंबई, नवी मुंबईत येतात, आपल्या परिसरात येऊन स्थायिक होत आहेत. देशभरातून जेव्हा लोक इथे येतात आणि या ठिकाणी आपलं कर्तृत्व गाजवण्याचा प्रयत्न करताहेत तेव्हा इथल्या स्थानिकांनासुद्धा आपलं कर्तृत्व इथं गाजवता आलं पाहिजे यासाठी त्याला संधी निर्माण करणे हे राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. याचबरोबर त्याला चांगले शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी शिक्षणाच्या चांगल्या संधी या परिसरात निर्माण करणे हीसुद्धा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातल्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे आणि म्हणून रामशेठ ठाकूरसाहेबांच्या नेतृत्वाखाली आज या परिसरामध्ये काम करत असताना ज्या व्यासपीठावरदेखील आपण राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून सर्वजण जेव्हा एकत्र येतो तेव्हा या परिसराचा विकास हाच ध्यास आपण मनापुढे ठेवून डोळ्यापुढे ठेवून काम करत राहिलेलो आहोत आणि याच दृष्टिकोनातून आमदार म्हणून मी, आमदार महेश बालदी व आमदार विक्रांत पाटील आम्हां तिघांची ही जी जबाबदारी आहे ती लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सातत्याने पार पडत राहू अशी ग्वाही या सत्काराच्या निमित्ताने देत आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

आपण सर्वांच्या उपस्थितीमध्ये आमचा जो सत्कार झाला त्या सत्काराचे उतराई होऊ शकत नाही, पण त्या सत्काराला या परिसरासाठी अधिकाधिक काम करून उत्तर देत राहू असे वचन या निमित्ताने आपणा सर्वांच्या समोर या ठिकाणी देतो. पुन्हा एकदा आपणा सर्वांचे या ठिकाणी आभार व्यक्त करत असताना ज्यांनी निवडून दिले त्या सर्वसामान्य जनतेला त्याबद्दल मनापासून धन्यवाद देऊन जनतेच्या हितासाठी सातत्याने काम करत राहू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले.

## पनवेल, उरणमधील रेल्वे प्रवाशांच्या समस्या मार्गी लावणार

आमदार महेश बालदी यांनी उरणकरांसाठी सकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत रेल्वे चालू करणे, दर अर्ध्या तासाने रेल्वे फेऱ्या वाढवणे, उरण ते सीएसएमटी रेल्वे सुरू करणे, स्थानकाबाहेर टू व्हीलर पार्किंग सेवा मोफत करणे, अशा मागण्या केल्या. महाप्रबंधक धरम वीर मीना यांनी पनवेल, उरणमधील रेल्वेसंबंधित समस्या व मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून येत्या जानेवारी अखेरीस सोडवण्याचे आश्वासित केले.

या बैठकीस भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, गव्हाण जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे, उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, युवा नेते वितेश म्हात्रे, नामदेव ठाकूर आदी उपस्थित होते.

# आजिवली येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** आजिवली येथून एक ३६ वर्षीय महिला कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेली आहे. ती अद्याप घरी परत न आल्याने तिच्या घरच्यांनी तालुका पोलीस ठाण्यात ती हरविल्याची तक्रार केली आहे. त्यानुसार तालुका पोलीस बेपत्ता महिलेचा शोध घेत आहेत. या महिलेचा रंग गोरा, केस काळे, चेहरा गोल, नाक सरळ, उंची पाच फूट पाच इंच, बांधा मध्यम असून अंगात राखाडी साडी व गळ्यात मंगळसूत्र, पायात पैंजण आणि जोडवी आहेत. या वर्णनाची महिला कोणास दिसल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाणे येथे माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस नाईक नितीन डगळे यांनी केले आहे.



# छतावर सौर ऊर्जानिर्मितीसाठी महावितरणतर्फे मोफत नेट मीटर



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून मोफत वीज मिळविण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आता महावितरणतर्फे ग्राहकांना मोफत नेट मीटर मिळेल. त्यामुळे ग्राहकांना आपल्या प्रकल्पात किती वीजनिर्मिती झाली व घरामध्ये किती विजेचा वापर झाला याची अद्ययावत माहिती मोबाईल ॲपवर मिळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून ग्राहकांना ही सवलत देण्यात येत आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. त्या अंतर्गत तीन किलोवॅटपर्यंतच्या क्षमतेचे प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते.

या योजनेत ग्राहकाच्या सौर ऊर्जा प्रकल्पात किती वीज तयार झाली, ग्राहकाने घरात किती वीज वापरली व किती अतिरिक्त वीज ग्राहकाकडून महावितरणला विकली गेली याची नोंद करण्यासाठी एक वेगळा नेट मीटर बसवावा लागतो. आतापर्यंत त्याचा खर्च ग्राहकाला करावा लागत होता. आता महावितरणने ग्राहकांना सोलर नेट मीटर विनामूल्य पुरविण्याचा निर्णय घेतला आहे.

## दुखवटा

### सुमन केदारी

**उरण :** पाणदिवे येथील सुमन शिवाजी केदारी (वय ६५) यांचे गुरवार (दि. १२) रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. प्रेमळ व मनमिळावू असा त्यांचा स्वभाव होता. पती,४ मुले, ५ नाती असा त्यांचा कुटुंब परिवार आहे. सुमन केदारी यांचा दशक्रिया विधी शनिवार ( दि. २१) रोजी श्री माणकेश्वर- उरण येथे झाला. (दि. २४) रोजी तेरावा विधी राहत्या घरी पाणदिवे येथे संपन्न होणार आहे. या दुःखद प्रसंगी कुठल्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नसल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी दिली आहे.



### बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराचा कळंबोलीत निषेध

# सकल हिंदू समाजातर्फे आक्रोश मोर्चा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचाराविरोधात कळंबोली सकल हिंदू समाजाच्या वतीने आक्रोश मोर्चाचे आयोजन रविवारी (दि.२२) करण्यात आले होते. या मोर्च्यामध्ये पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत निषेध केला. कळंबोलीतील पोलीस निवारा सर्कलपासून या मोर्च्याची सुरुवात झाली असून सेक्टर १६ येथील बस डेपोजवळ सांगता झाला. मोर्चादरम्यान जोरदार निदर्शने करत बांगलादेश सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला.

बांगलादेशात अलीकडेच सत्तांतर झाले जेव्हापासुन हे सरकार अस्तित्वात आले तेव्हापासून बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू हे कट्टरपंथी मुस्लिम अराजकतावादी मुस्लिम यांच्या अत्याचाराचे बळी जात आहेत. हिंदू तसेच इतर अल्पसंख्याक समुदायातील जनतेवर मुस्लीम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हल्ले, हत्या, लूटमार, दरोडे, जाळपोळीच्या घटना, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याक समुदायातील मुले आणि महिलांवरील अमानवीय अत्याचार हा भारतातील हिंदू समुदायाला चिंता करायला लावणारा आहे. हे सर्व अत्याचाराचे प्रकार बांगलादेशातील सरकारी यंत्रणा आणि पोलीस यांच्या देखरेखीत घडत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. याच्यानिषेधार्थ कळंबोली हिंदू समाजाच्या वतीने रविवारी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस निवारा सर्कल जवळून सुरू झालेला हा मोर्च्या पुढे आयडीबीआय बँक, कार्मेल स्कूल, मंगलेश्वरी माता मंदिर सर्कल, गुरुद्वारा असे मार्गक्रमण करत सेक्टर मधील बस डेपो जवळ सांगता झाला.

या मोर्चामध्ये पनवेल मतदार सांघाचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, बिना गोगरी, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, कळंबोली शहर सरचिटणीस दिलीप बिस्ट, चिटणीस मनीष तिवारी, उत्तर भारतीय मोर्चाचे मंडळ अध्यक्ष केशव यादव, अखिलेश तिवारी, सतीष शर्मा, जितेंद्र तिवारी, संदीप म्हात्रे, मनीष तिवारी, सुनील ठोंबरे, संजय दोडके, आबा घुटुकडे, केशव यादव, सुशीला शर्मा, कमल कोठारी, राणी राणापुर, लैला शेख, नीता अधिकारी, सुनिता हिरवले, शुभांगी निर्मले यांच्यासह गुढीपाडवा समितीचे सर्व पदाधिकारी, सर्वपक्षीय पदाधिकारी आणि हिंदू समाजातील सर्व संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# ‘सीकेटी’मध्ये इंटेरियरचे प्रदर्शन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात बोहेमिअन इंटेरियर या संकल्पनेवर आधारीत निर्मिती २०२४-२५ या प्रदर्शनाचे उदघाटन संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि.२३) झाले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सीकेटी कॉलेज आर्टस, कॉमर्स आणि सायन्समधील बी.सी. ठाकूर सेंटर फॉर स्कील डेव्हलपमेंटच्या इंटेरियर डिझाईन विभागाचे निर्मिती-२४-२५ नामक प्रदर्शन, २३ आणि २४ डिसेंबर, २०२४ या दोन दिवशी भरवण्यात आले आहे. त्या वर्षीचे प्रदर्शन ’बोहेमिअन् इन्टेरिअर’ या संकल्पनेवर या संकल्पनेवर आधारित भरवण्यात आले आहे.

या प्रदर्शनच्या उद्घाटनावेळी संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमूख, सचिव एस.टी. गडदे, प्राचार्य एस. के. पाटील, अर्किटेक्ट निशिथ कोठारी, पल्लवी कदम आदी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी प्रदर्शनाचा पाहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा वार्षिक सोहळा विद्यार्थाच्या कौशल्य व मेहनतीचा सोहळा आहे. ज्यामध्ये मुलांनी त्यांच्या शैक्षणिक वर्षातील विविध प्रकल्प, कलाकृती, आणि सेट डिझाईन्स प्रदर्शित केल्या आहेत.

या वेळी विभागाच्या प्रमुख अर्किटेक्ट प्रज्योती देसाई यांनी विविध विभागाला विविध संसाधने उपलब्ध करून दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले.



# करंजाडे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी सिडकोकडे पाठपुरावा करणार

## खासदार श्रीरंग बारणे यांचे आश्वासन

**पनवेल : वार्ताहर**



करंजाड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन होण्यासाठी सिडकोकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन सोमवारी प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या भेटीमध्ये खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले.

प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने करंजाडेमध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन व्हावे यासाठी सतत पाठपुरावा करत असून या वेळी मावळ लोकसभा मतदारसंघातील खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची पनवेल येथे भेट घेतली.

या वेळी आंबेडकरी चळवळीतील अनुयायी कुणाल लोंढे, प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे दिगंबर साळवे, धनंजय ताटे, गणेश डोळस, नितीन कांबळे, उपस्थित होते. या संदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यांनी सिडकोचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक सिडको यांच्या समवेत लवकरच बैठक लावण्यात येणार आहे, असे आश्वासन दिले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात जागतिक ध्यान दिवस साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**



आजच्या तणावग्रस्त जीवनशैलीत, लोक कामाच्या ओझ्यामुळे आणि दैनंदिन समस्यांमुळे चिंतेत राहतात. यामुळे ते सहजपणे कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. मानसिक आरोग्याचा विचार करता, ध्यान किंवा चिंतन ही प्रभावी पद्धत आहे, जी केवळ मानसिक तणाव कमी करत नाही तर जीवनशैलीत सकारात्मकता आणते.

या दिवसाच्या औचित्य साधून रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिन म्हणून साजरा केला. या निमित्ताने आर्ट ऑफ लिविंग या संस्थेने मेडिटेशनवरती सत्राचे आयोजन केले होतेल तसेच मेडिटेशनचा इतिहास, त्याचे फायदे आणि योग्य पद्धत या विषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिक करून दाखवले. या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेडिटेशन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी जागतिक ध्यान दिवस साजरा केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन प्रा. रिजवान मोमीन यांनी केले तसेच स्टाफ वेल्फेअर समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहून सहकार्य केले.

# चार बांगलादेशी ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

कोपरा गावातील भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या चार बांगलादेशीय नागरिकांना नवी मुंबई पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पोलिसांनी ताब्यात घेतले. खारघर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कोपरा गावातील येथील एका खोलीमध्ये भाड्याने बांगलादेशातील नागरिक राहत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना मिळाल्यानंतर खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक दीपक सूर्वे यांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध आणि स्थानिक पोलिसांचे संयुक्त पथक स्थापन करून सदर ठिकाणी सापळा रचला.

पोलिसांच्या पथकाने या वेळी भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या ३७ वर्षीय अमिषा कमाल काजी, १८ वर्षीय शर्मिन कमाल काजी, ४० वर्षीय राणी किमारुल शेख, २७ वर्षीय सैफ्फुला अहमद अली खान यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या महिला व तरुणींकडे चौकशी केल्यावर खारघर व परिसरात या घरकाम करत असल्याचे समजले.

# ‘सीकेटी’त राज्यसेवा पूर्वपरीक्षा प्रश्न विश्लेषण विषयावर मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये शनिवारी (दि.२१) नुकत्याच झालेल्या राज्यसेवा पूर्वपरीक्षा २०२४ या परीक्षेच्या प्रश्नांचे विश्लेषण आणि पेपर सोडवण्यासाठी लागणारे कौशल्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचे आयोजन महाविद्यालयातील डॉ. सी.डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात आले होते.

या सत्राला वस्तू व सेवा कर विभागाचे राज्य कर निरीक्षक आणि करिअर मार्गदर्शक रवींद्र माने यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. नेमके स्पर्धा परीक्षा देतांना पेपर सोडवण्याचे कसब कसे असायला हवे, पेपर सोडवण्यासाठीचा दृष्टिकोन कसा असायला हवा. यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच स्पर्धेत यश मिळवण्यासाठी च्या काही युक्त्या त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितल्या. सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसादात वक्त्यांना अनेक प्रश्न विचारले आणि त्या सर्व शंकांचे सुंदर निरसन वक्त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजना करिता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. संजय पाटील आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. बी. डी. आघाव यांचे मार्गदर्शन लाभले तसेच डॉ. सी.डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे अध्यक्ष डॉ. जे. एम. पावरा, अर्थशास्त्र विभागाचे प्रा. हरिभाऊ खरात आणि इतिहास विभागाच्या प्रा. शिल्पा राठोड व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या लिपिक मनाली परब यांचे सहकार्य लाभले.

सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभागाचे प्रा. हरिभाऊ खरात आणि आभार डॉ.सी.डी. देशमुख केंद्राचे समन्वयक विजयेंद्र शितोळे यांनी मानले.

## रामबागचा वर्धापन दिन उत्साहात साजरा











# बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची तळोजा कारागृहाला भेट; जाणून घेतली व्यवस्थेची कार्यपद्धती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक उपक्रमाचा एक भाग म्हणून, भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातील च्या विद्यार्थ्यांनी शनिवारी (दि.२१) तळोजा कारागृहाला भेट देऊन तुरुंग व्यवस्थेच्या कार्यपद्धतीची मौल्यवान माहिती मिळवली.

प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीचा उद्देश कारागृह व्यवस्थापनाच्या प्रशासकीय, कायदेशीर आणि पुनर्वसनात्मक पैलूंबद्दल सर्वसमावेशक समज प्रदान करणे, विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानाच्या पलीकडे व्यावहारिक प्रदर्शन प्रदान करणे. तळोजा कारागृहातील सहकारी कर्मचाऱ्यांनी या भेटीचे काळजीपूर्वक आयोजन केले होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना उत्तम आणि माहितीपूर्ण अनुभव मिळेल.

कारागृहातील प्रमुख क्षेत्रांचा शोध घेण्यात आला, ज्यात स्वयंपाकघर, जे कैद्यांच्या आहाराच्या गरजा पूर्ण करते आणि बहुउद्देशीय हॉल, जेथे तुरुंगातील लोकसंख्येमध्ये समावेशकता आणि समुदाय वाढवण्यासाठी सण साजरे केले जातात. या भेटीचे एक विशेष उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे ऑनलाईन सुनावणी कक्ष, जे व्हर्च्युअल कोर्ट सत्रे सुलभ करते, हे सुनिश्चित करते की कैदी सुविधा न सोडता कायदेशीर प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात.



विद्यार्थ्यांनी कायदेशीर मदत सेवा कक्षालादेखील भेट दिली, जिथे कैद्यांना महत्त्वपूर्ण कायदेशीर सहाय्य मिळते, न्याय आणि न्याय्य वागणुकीसाठी तुरुंगाची बांधिलकी अधोरेखित केली. विद्यार्थ्यांसाठी सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे तळोजा कारागृहातील युनिक आयडेंटिफिकेशन सिस्टीम. प्रत्येक आरोपी किंवा खटल्याखालील व्यक्तीला एक वेगळा क्रमांक दिला जातो, ज्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस आणि न्यायिक अधिकाऱ्यांना सर्वसमावेशक प्रकरणाच्या तपशीलांमध्ये कार्यक्षमतेने प्रवेश करता येतो. ही प्रणाली फौजदारी न्याय प्रणालीमध्ये समन्वय आणि पारदर्शकता वाढवते.

पोलीस उपनिरीक्षक (PSI) सोबतच्या एका आकर्षक सत्राद्वारे ही भेट अधिक माहितीपूर्ण बनली, ज्यांनी तुरुंगातील कामकाजाविषयी तपशीलवार अंतर्दृष्टी सामायिक केली आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली, सुधारात्मक प्रणालीची सखोल माहिती दिली. भेटीच्या समारोपाच्या वेळी, विद्यार्थी समन्वयक अपूर्वा जाधव यांनी पोलीस अधिकारी आणि तुरुंग कर्मचाऱ्यांचे त्यांच्या पाठिंब्याबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले, ज्यामुळे हा अनुभव सर्व सहभागींसाठी उद्बोधक आणि संस्मरणीय ठरला.

या भेटीमुळे बीसीटी कॉलेज ऑफ लॉच्या विद्यार्थ्यांना त्यांचे सैद्धांतिक ज्ञान व्यावहारिक प्रदर्शनासह जोडण्याची अनोखी संधी मिळाली, ज्यामुळे भारतातील सुधारात्मक आणि कायदेशीर प्रणालींबद्दल त्यांची समज समृद्ध झाली.

## संपादकीय

# काँग्रेसची नाटकमंडळी

जातीजातींमध्ये तेढ निर्माण करून स्वत:ची पोळी भाजून घ्यायची काँग्रेसची जुनीच खोड आहे. मुखात गरीब, दलित आणि मुस्लिम बांधवांप्रती कळवळ्याची भाषा आणि अंतरंगात मतपेढीची गणिते हे काँग्रेसचे जुनेच धोरण आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांच्या परभणी भेटीतून यापेक्षा वेगळे काहीही केले नाही.

**वारंवार निवडणुकांमध्ये सपशेल मार खाल्ल्यानंतरही काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमध्ये सुधारणा होताना दिसत नाही. कारण आपल्यात सुधारणेला काही वावच नाही असा परिपूर्ण भ्रम या काँग्रेसी मंडळींना झालेला दिसतो. परभणीमध्ये दहा डिसेंबर रोजी जी घटना घडली, ती दुदर्वीच होती हे कोणीही नाकबूल करणार नाही. रेल्वेस्थानकासमोरील डॉ. बाबासाहेब आंबडेकर चौकातील संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड एका माथेफिरूने केली. हे कृत्य करणारा इसम मनोरुग्ण असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरीही या घटनेनंतर दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली आणि जाळपोळीच्या घटना घडल्या. यासंदर्भात पोलिसांनी पन्नासएक संशयित दंगलखोरांची धरपकड केली. त्यात सोमनाथ सूर्यवंशी हे दलित कार्यकर्ते व कायद्याचे विद्यार्थी होते. कोठडीतच त्यांच्या छातीत दुखू लागल्याने पोलिसपथकाने त्यांना सरकारी इस्पितळात नेले. तेथे त्यांचा मृत्यू झाला. या घटनेला जातीय रंग देऊन राजकीय पोळी भाजण्याचा खटाटोप काँग्रेसने सुरू केला आहे. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी सोमवारी परभणीला भेट देऊन सूर्यवंशी कुटुंबियांचे सांत्वन केले. वरकरणी हा सांत्वन-दौरा माणुसकीला धरून असल्याचे चित्र निर्माण होते. परंतु त्यापाठीमागे भयंकर जातीय आणि राजकीय गणित आहे हे लक्षात घ्यायला हवे. सूर्यवंशी कुटुंबियांची भेट घेऊन झाल्यानंतर गांधी म्हणाले की या प्रकरणाची माहिती मी घेतली. काही छायाचित्रे व चित्रफीती मला दाखवण्यात आल्या. त्यावरून सूर्यवंशी यांची पोलिसांनी हत्याच केली हे उघड झाले आहे. सूर्यवंशी हे दलित होते व संविधानाचे रक्षण करत होते म्हणून त्यांची हत्या करण्यात आली. आता गांधी यांनी तोडलेल्या या ताऱ्यांबद्दल काय म्हणायचे? वास्तविक या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐन अधिवेशनातच जारी केले आहेत. तसेच परभणीतील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची तातडीने बदली करण्यात आली आहे. न्यायालयीन चौकशीत सत्य बाहेर येईलच. परंतु त्याआधीच राहुल गांधी आपला न्यायनिवाडा देऊन मोकळे झाले आहेत. न्यायालयीन चौकशी निष्पक्ष असते, परंतु काँग्रेसी नेत्यांचा न्यायालयांवर देखील बहुदा विश्वास राहिलेला नाही. किंबहुना त्यांचा प्रत्येक व्यवस्थेवरचा विश्वास उडाला आहे. न्यायालये विकली गेली आहेत, निवडणूक आयोग बाहुले आहे, तपासयंत्रणा बटिक आहेत, प्रशासन गुलाम आहे, आणि माध्यमे तर केव्हाच विकली गेली असल्याचा ठाम दावा काँग्रेस समर्थक करतात. वस्तुस्थिती अशी आहे की भारताच्या जनतेचाच काँग्रेसवरील विश्वास सपशेल उडाला असून नजीकच्या भविष्यकाळात या पक्षाचा जीर्णोद्धार शक्य होणार नाही. केंद्रात राहुल गांधी ज्या प्रकारचे राजकारण करतात, त्याचीच री महाराष्ट्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासारखे नेते ओढतात. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपप्रणित महायुतीला जो प्रचंड जनादेश मिळाला, त्याला नाना पटोले यांचे नकारात्मक राजकारण देखील कारणीभूत आहे. काँग्रेसचे हे नकारात्मक राजकारण जोवर चालू राहील, तोवर या पक्षाला काहीही भविष्य नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. काँग्रेसची नाटकमंडळी अशीच चालू राहणार असेच एकंदरीत चित्र आहे.**

# महाडमध्ये बेकायदा उत्खनन, बांधकाम, वाळू विक्रीकडे लक्ष हवे!






**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड तालुक्यामध्ये महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे बेकायदेशीर माती उत्खनन, विनापरवाना वाळू उत्खनन आणि विक्री, नदीलगत सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करत होणारी बांधकामे जोमाने सुरू आहेत. याबाबत होत असलेल्या तक्रारींना देखील केराची टोपली दाखवत महसूल विभाग आपले ध्येय साध्य करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

महाड तालुक्यामध्ये बहुतांश भाग हा डोंगराळ आणि उंच सखल आहे. शिवाय महाड तालुक्यातील अनेक गावं पश्चिम घाट संवर्धन यादीत समावेश असलेली आहेत. तालुक्यात होणाऱ्या अतिवृष्टी मुळे हा परिसर दरडप्रवण झाला आहे. या भागात प्रतिवर्षी होणाऱ्या भूस्खलनामुळे हा परिसर संवेदनशील झाला आहे. महाड तालुक्यात वारंवार होणाऱ्या भूस्खलनामुळे उत्खनन करण्यावर काही ठिकाणी मनाई असली तरी महसूल विभागाच्या संगनमताने ठिकठिकाणी वारेमाप उत्खनन सुरू आहे. पर्यावरण विभागाचे नियम धाब्यावर बसून हे उत्खनन केले जात असल्याने दरडींचा धोका आणखीच वाढला आहे. १९९२ मध्ये पारमाची येथून सुरू झालेले दरडींचे सत्र आजदेखील कायम आहे. सातत्याने होणारे भूस्खलन, जमिनीला पडणाऱ्या भेगा आणि दरडी कोसळणे सुरूच असले तरी शासन मात्र या ठिकाणी काटेकोर पावले उचलत नसल्याचे दिसून येत आहे. आज देखील कोणत्याच प्रकारची परवानगी नसताना देखील दगडखाणी, डोंगरांच्या पायथ्याशी होणारे माती उत्खनन, सावित्री नदीमध्ये काढली जाणारी वाळू, कृत्रिम रेती प्रकल्प बिनदिक्कत सुरू असल्याचे दिसून येत आहे. महसूल विभागाचे तलाठी गावोगाव काम करत असले तरी याबाबत कोणत्याच प्रकारची नोटीस अथवा खबर महसूल विभागापर्यंत पोहोचू देत नाहीत असे महसूल अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

महाड महसूल कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार सध्या तरी कोणत्या ठिकाणी वाळू उत्खनन अथवा विक्रीला परवानगी दिलेली नाही, त्याचप्रमाणे तालुक्यात असलेल्या दगड खाणी आणि कृत्रिम वाळू प्रकल्पांना देखील परवानगी दिलेली नाही असे असताना देखील सर्व ठिकाणी बिनधास्त पणे अशा प्रकारचे उत्खनन सुरू आहे. तालुक्यातील सावित्री गांधारी आणि काळ नदीमध्ये सध्या वाळू उत्खनन जोमाने सुरू आहे. सकाळी आठ वाजता वाळूचे डंपर वाळू वाहून नेत आहेत. त्याचप्रमाणे दगड खाणीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जात आहे. यामध्ये महाड महसूल विभागाची शासकीय तिजोरी भरली जात नसली तरी कर्मचारी मात्र जाणीवपूर्वक का दुर्लक्ष करत आहेत याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

महाड तहसील कार्यालय आणि उपविभागीय अधिकारी कार्यालय या ठिकाणाहून उत्खननाची मर्यादेनुसार परवानगी दिली जाते. पावसाळ्यामध्ये उत्खनन परवानगी दिली जात नाही. आता पावसाळा संपून दोन महिने झाले असले तरी अद्याप कोणत्याच ठिकाणी वाळू माती दगड उत्खनन करण्यास परवानगी दिलेली नाही असे उत्तर दिले जात आहे. याबाबतीत दोन्ही कार्यालय एकमेकांकडे बोट दाखवत असल्याचे देखील दिसून येते. महाड तालुक्यात पंढरपूर रायगड महाराजांचे काम देखील सुरू आहे मात्र याबाबतीत देखील माती उत्खनन करण्यासाठी पावसाळ्यानंतर रॉयल्टी भरलेली नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. तालुक्यात भावे, बारसगाव, पिंपळवाडी, कोल, सव, टोळ आदी ठिकाणी दगड खाणी आहेत. तर दोन्ही रस्त्यांच्या कामांचे सिमेंट मिक्सर प्लांट, आणि टोळ गावात कृत्रिम वाळू प्रकल्प कार्यरत आहेत. या सर्व ठिकाणी विनापरवाना उत्खनन जोमाने सुरू आहे तर तिन्ही नद्यांच्या काठाला अधिकृत बांधकामेदेखील सुरू आहेत. याबाबत महाड महसूल विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

# आज राष्ट्रीय ग्राहक दिन

भारतात दरवर्षी २४ डिसेंबरला 'राष्ट्रीय ग्राहक दिन' साजरा केला जातो. १९८६मध्ये आजच्याच दिवशी ग्राहक संरक्षण कायदा तयार करण्यात आला. तर, सन १९९१ आणि १९९३मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. या कायद्याचा जास्तीत जास्त वापर केला जावा म्हणून डिसेंबर २००२मध्ये पुन्हा या कायद्यात दुरुस्तीकरण्यात आलीयानंतर १५ मार्च २००३पासून या कायद्याच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. तथापि, या कायद्यातसुद्धा १९८७मध्ये सुधारणा करण्यात आली होती. परंतु, ५ मार्च २००४ रोजी याची संपूर्ण अधिसूचना देण्यात आली.२०००मध्ये प्रथमच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला होता. आजच्या दिवशी ग्राहकांना त्यांच्या अधिकारांची माहिती मिळावी आणि ते याबाबत जागरूक व्हावेत यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. केंद्र सरकारने यावर्षी जुलैमध्ये ग्राहक संरक्षण कायदा २०१९अंतर्गत नवीन ई-कॉमर्स नियम लागू केले आहेत. वास्तविक, ऑनलाईन शॉपिंगच्या ट्रेंडमुळे हे बदल केले गेले आहेत. ऑनलाईन खरेदी प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात फसवणूकीच्या तक्रारी समोर येत आहेत. हे नवीन नियम ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, स्नॅपडील सारख्या ई-कॉमर्स साईटवरही लागू होतील. त्यात ई-कॉमर्स साईटसाठी अनेक कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. नवीन नियमांनुसार बनावट व भेसळयुक्त वस्तू विकणाऱ्यास जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते.

ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी हा कायदा अंमलात आला आहे. या कायद्यांतर्गत कोणताही ग्राहक कोणत्याही प्रकारच्या अन्यायकारक व्यापाराची तक्रार करू शकतो, ज्यासाठी त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळातील व्यापारांच्या व्यवहाराची हाताळणी लक्षात घेऊनच हा कायदा लागू करण्यात आला होता

ग्राहकांचे मुख्य अधिकार :-१. सुरक्षिततेचा अधिकार २. माहितीचा अधिकार ३.निवड करण्याचा अधिकार ४. समस्या निराकरण करण्याचा अधिकार ५. ग्राहक शिक्षणाचा अधिकार ६.व्यापाऱ्यांची हेराफेरी. एक नागरिक म्हणून, राज्यघटनेने आपल्याला नागरिकत्वाचे हक्क दिले तसेच, ग्राहक म्हणूनही आपल्याला काही अधिकार देण्यात आले आहेत. त्यातील पहिला आणि सर्वात मोठा हक्क म्हणजे ग्राहकांना दिलेल्या किंमतीच्या समान वस्तू त्यांना मिळाली पाहिजे.

वाजवी किंमत आणि शुद्धता या ग्राहकाच्या मुख्य गरजा आहेत. ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी ग्राहक संरक्षण कायदा बनविला गेला आहे. या कायद्यानुसार आता कोणताही ग्राहक अनुचित व्यापाराची तक्रार करू शकतो. यासाठी त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळात व्यावसायिकांच्या व्यवहारात होणारी हेराफेरी लक्षात घेऊनच हा कायदा बनवला गेला आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# नेकबँड विरुद्ध इयरबड्स, कोणते फायद्याचे? जाणून घ्या

आज आम्ही तुम्हाला इयरबड्सविषयी महत्त्वाची माहिती देणार आहोत. तुम्ही नेकबँड किंवा इयरबड्स वापरत




असाल तर ही माहिती तुम्ही नक्की वाचा. वायरलेस नेकबँड आणि इयरबड्स आता ट्रेंड बनले आहेत, परंतु बऱ्याचदा युजर्स त्यापैकी एक निवडू शकत नाहीत. आपल्यासाठी कोणते नेकबँड किंवा इयरबड्स चांगले आहेत, याची तुलना करूया आणि आपण समजून घेऊया.

आजकाल सर्वच वयोगटातील मंडळी इयरबड्स आणि नेकबँडचा वापर करताना दिसतात. पण तुम्हाला कधी प्रश्न पडला आहे का की, कोणते इयरबड्स योग्य? नेकबँड किंवा इयरबड्स यापैकी कोणते वापरावे? आजकाल वायरलेस ऑडिओचा ट्रेंड खूप वाढला आहे आणि अनेकदा येणारे दोन मुख्य पर्याय म्हणजे नेकबँड आणि इयरबड. दोन्ही पोर्टेबल आणि आरामदायक आहेत. परंतु त्यांचे फीचर्स, फायदे आणि तोटे यात काही आवश्यक फरक आहेत. या दोन्ही प्रकारच्या ॲक्सेसरीजची तुलना करू जेणेकरून आपल्यासाठी कोणते योग्य आहे, हे आपण ठरवू शकता.

नेकबँडमध्ये दोन इयरपीस असतात जे गळ्याच्या मागील बाजूस घातलेल्या लवचिक बँडद्वारे जोडलेले असतात. या बँडमध्ये बॅटरी, ब्लूटूथ, चिप आणि कंट्रोल बटन देण्यात आलं आहे. त्याचवेळी इयरबड्स लहान, वायरलेस इयरपीस आहेत जे थेट कानात ठेवले जातात. ते पूर्णपणे स्वतंत्र आहेत आणि कोणत्याही स्ट्रिंग किंवा बँडशिवाय कार्य करतात. ते चार्जिंग केससह येतात जे त्यांना साठवण्याचे आणि चार्ज करण्याचे काम करतात.

इयरबड्स दोन वेगवेगळ्या भागांमध्ये केसमधून काढून टाकले जातात आणि ब्लूटूथसह वायरलेस कनेक्टिव्हिटी प्रदान करतात. याशिवाय नेकबँडमध्ये ब्लूटूथसह कनेक्टिव्हिटी उपलब्ध आहे. परंतु दोन्ही इयरटिप्स वायरद्वारे आपल्याशी जोडलेल्या आहेत. इयरबड्स कानाच्या आत ठेवले जातात आणि मानेवर घातल्यानंतर नेकबँडचा वापर करता येतो. हार्डवेअर बटणांच्या साहाय्याने नेकबँडवर कंट्रोल सहज मिळवता येतं. काही इयरबड्समध्ये टच कंट्रोलच्या पर्याय असला तरी नेकबँडवर चांगले हार्डवेअर कंट्रोल देण्यात आले आहेत. बाकी फीचर्सबद्दल बोलायचे झाले तर नेकबँड आणि इयरबड्स दोन्ही सारखेच काम करतात आणि त्यांना समान फीचर्स मिळतात. काही इयरबड्स एएनसी आणि ईएनसी किंवा इक्विलायझर कंट्रोल ऑफर करणाऱ्या समर्पित ॲप्ससह उपलब्ध आहेत.

# प्रसिद्ध लेखक, शिक्षक साने गुरुजी



**निमित्त**

पांडुरंग सदाशिव साने, म्हणून ओळखले जाणारे भावनिक, मराठी लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र, भारत येथील स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांना विद्यार्थी व अनुयायी साने गुरुजी म्हणून ओळखत त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली जवळील पालगड, या गावात झाला झाला.

त्यांचे वडील सदाशिवराव हे एक महसूल कलेक्टर होते ज्यांना परंपरेने खोत असे संबोधले जात असे. त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोली तालुक्यातील पालगड या गावी झाले. त्यांना पुढील शिक्षणासाठी मामाकडे पुण्यात पाठविण्यात आले. पण पुण्यात त्यांचे मन रमले नाही, परत ते दापोली येथील मिशनरी शाळेत राहण्यासाठी पालगडला आले. दापोली येथे असताना मराठी व संस्कृत या दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवणारे हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची पटकन ओळख झाली. त्यांना कवितेतही रस होता.

दापोली येथील शाळेत शिक्षण घेत असताना त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावली त्यामुळे त्यांना पुढील शिक्षण घेणे परवडणारे नव्हते.साने यांनी कौटुंबिक आर्थिक मदतीसाठी नोकरी करण्याचा निर्णय घेतला. तथापि त्यांच्या वडिलांनी पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना औंध संस्थेत दाखल केले नंतर नूतन मराठी विद्यालयात विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला.पुण्यात शिक्षण घेत असताना खूप त्रास सहन करावा लागला, त्यांना वेळेवर पोट भरून जेवण भेटत नव्हते. तरीही या सर्व संकटाना सामोरे जात त्यांनी त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावली.

यांनी १९१८ साली हायस्कूल मधून मॅट्रिक झाले. त्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी सर परशुरामभाऊ कॉलेज मधून पूर्ण केले. तेथे त्यांनी बी.ए. ची पदवी मिळवली. पुढे त्यांनी मराठी आणि संस्कृत साहित्यात एम.ए. ची मास्टर डिग्री पूर्ण केली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अंमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे नोकरी केली. साने हे एक प्रतिभाशाली वक्ते होते आणि नागरी हक्क आणि न्याय यावर त्यांनी प्रभावी भाषण देऊन लोकांना आकर्षित केले.

त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतः च्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली. अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला.सहा वर्ष नोकरी केल्यानंतर त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सामील होण्यासाठी शालेय नोकरीचा राजीनामा दिला. त्या वेळी १९३० साली महात्मा गांधींनी दांडी यात्रा चालू केली होती.नागरी अवज्ञा चळवळीत काम केल्याबद्दल ब्रिटिश अधीकार्यांनी त्यांना धुळे कारागृहात पंधरा महिन्यासाठी तुरूंगात टाकले होते.

१९३० ते १९४७ या कालावधीत साने गुरुजी वेगवेगळ्या आंदोलनात सहभागी झाले आणि आठ वेळा त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. साने गुरुजीं यांना त्रिचन्नापल्ली तुरुंगात डांबले गेले, तेव्हा त्यांनी तामिळ आणि बंगाली भाषा शिकली. त्यांनी त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केले. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली.

श्यामची आई (श्यामची आई), अस्तिक (द बिलिव्हर), गॉड शेवत (स्वीट एंडिंग) आणि टॉल्स्टॉयच्या कला म्हनाजे काय? या टॉल्स्टॉयच्या 'व्हॉट इज आर्ट' या पुस्तकाचा मराठी अनुवाद या त्यांच्या प्रमुख कादंबऱ्या आहेत. स्वातंत्र्यसैनिक, गांधींचे अनुयायी. त्यांनी भारती सौंस्कृति नावाचे पुस्तक लिहिले. अस्पृश्यांच्या कल्याणासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. सामाजिक-सांस्कृतिक मुक्तीचे साधन म्हणून त्यांनी ऑगस्ट १९४८ मध्ये सुरू केलेले साधना साप्ताहिक त्यांचा संदेश देत आहे. त्यांच्या सन्मानार्थ भारतीय टपाल तिकीट जारी केले जाते. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : येथील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी सुट्टीच्या दिवशी पर्यटकांनी गर्दी केली होती.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# झोपताना डोक्याखाली उशी घेतल्याने काय परिणाम?

झोपेच्या वेळी आपण स्वतःची स्थिती कशी ठेवतो यावर आपल्या आरोग्यावर काय लक्षणीय परिणाम होणार ते अवलंबून असते. बरेच लोक त्यांचे डोके थोडे वर करून झोपणे पसंत करतात. परंतु, या स्थितीमागील विज्ञान समजून घेतल्यास फायदे आणि संभाव्य तोटे दिसून येतात.



जेव्हा झोपेत तुम्ही घराच्या छताकडे डोके करून झोपता तेव्हा गुरुत्वाकर्षणामुळे डोके आणि मानेच्या भागातील रक्तवाहिन्यांमधील दाब कमी होण्यास मदत होते. परंतु, उशी खूप उंच असल्यास, रक्तप्रवाह मर्यादित होऊ शकतो आणि त्यामुळे अस्वस्थता निर्माण होऊ शकते.डोके उंचावल्याने पोटातील ॲसिड अन्ननलिकेत परत येण्यापासून रोखले जाते. त्यामुळे रात्रीच्या वेळी छातीत जळजळ होणे आणि अस्वस्थता जाणवण्याचा धोका कमी होतो.

जेव्हा डोके जमिनीपासून योग्य उंचीवर म्हणजे सामान्यत: १५-३० अंशांदरम्यान असते, तेव्हा ते मणक्याला तटस्थ राखण्यास मदत करू शकते, तथापि, तज्ज्ञ सांगतात की, चुकीच्या उंचीमुळे समस्या उद्भवू शकतात. डोके खूप उंच ठेवून किंवा अस्ताव्यस्त अवस्थेत झोपल्याने मानेच्या मणक्याला त्रास होऊ शकतो. एकंदरीत अशा अवस्थेत झोपल्याने मानेचे स्नायू आणि पाठीच्या वरच्या भागावर ताण येतो.

झोपेच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम विविध व्यक्तींच्या बाबतीत वेगवेगळा असतो. ही स्थिती विशेषत: ज्यांना श्वास घेण्यास त्रास होतो अशा व्यक्तींसाठी त्रासदायक असू शकते. जर तुम्ही वापरत असलेल्या उशीची उंची योग्यरीत्या ठेवली नाही, तर त्यामुळे तणाव किंवा अस्वस्थता निर्माण होऊ शकते आणि त्यामुळे तुमच्या गाढ झोपेवर परिणाम होऊ शकतो.

**झोपेच्या या स्थितीचा विचार कोणी करावा?**

तज्ज्ञांच्या मते, झोपताना डोक्याखाली उशी घेणे विशेषतः फायदेशीर आहे. ॲसिड रिफ्लक्स किंवा जीईआरडी असलेल्यांसाठी उपयुक्त ठरेल.ज्यांना स्लीप ॲप्निया किंवा ज्यांना खूप घोरण्याची सवय आहे अशांसाठी साह्यकारी आहे. तसेच सायनसची समस्या असलेल्या व्यक्तींसाठीही ती मदत करणारी आहे. आरोग्याच्या अनेक पैलूंप्रमाणे एक व्यक्तीसाठी जे कार्य करते, ते कार्य दुसरी व्यक्ती करू शकत नाही. त्यामुळे झोपताना डोक्याखाली योग्य उशीचा आधार शोधणे ही मुख्य गोष्ट आहे, जी आरामदायी, शांत झोपेचा अनुभव देते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# पालीकरांचा शुद्ध पाणी व बायपासचा प्रश्न सोडविणार -खासदार धैर्यशील पाटील

**पाली : प्रतिनिधी**

पालीकरांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मूलभूत व जीवनावश्यक शुद्ध पाणी पुरवठा योजना व बलाप – पाली बायपासचा प्रश्न माझ्या खासदारकीच्याच काळात सोडविणार असल्याची ग्वाही खासदार धैर्यशील पाटील यांनी नागरी सत्कार सोहळ्यात दिली.

महाराष्ट्रातील होतकरू आणि प्रतिभावंत कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान च्या वतीने पाली नगरीत राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धांचे आयोजन केले आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने राज्यसभेचे नवनिर्वाचित खासदार धैर्यशील पाटील यांचा भव्य सत्कार रविवार दि.(२२) रोजी रात्री ९ वाजता प्रकाशभाऊ देसाई व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.




यावेळी सत्काराला उत्तर देताना सुधागड पाली विषयी कृतज्ञता व्यक्त करत खासदार धैर्यशील पाटील पुढे म्हणाले की खासदार म्हणून मला माझ्या सुधागड साठी अत्यंत महत्वाच योगदान द्यायचे आहे. यामध्ये पालीला स्वच्छ मुबलक पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे, व अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीची वाहतूक कोंडीची समस्या कायमची सोडवणे यासाठी पालीचा बाह्यवळण रस्ता हे प्रश्न खासदारकीच्या काळात सोडविण्यावर प्रामुख्याने भर देणार आहे. या प्रश्नावर सर्व सामाजिक व राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी यांना सोबत घेऊन एक समन्वय बैठक घेऊन सर्वांच्या सहकार्याने अमृत २ मधून ५ टक्के लोकवर्गणी वापरून पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे ही पुढची भूमिका असेल असे खासदार पाटील म्हणाले.

सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे आधारस्तंभ असलेले प्रकाशभाऊ देसाई यांनी सलग १२ वर्ष सातत्याने राज्यस्तरीय स्पर्धा घेऊन पालीचे सांस्कृतिक अभिजातपण उत्तमप्रकारे सांभाळण्याचे काम केले. कलाकाराची कलेवर कितीही निष्ठा असली तरी कलेला आर्थिक आधार मिळणे गरजेचे असते, असा आर्थिक पाठिंबा आधार देणारे समाजात कमी आहेत, ही उणीव भरून काढली म्हणून त्यांचे विशेष कौतुक केले.

नाटक, भारुड यांनी महाराष्ट्राचे केवळ करमणूक मनोरंजन म्हणून काम केले नाही, तर महाराष्ट्राचा प्रबोधनात्मक, वैचारिक वारसा जपण्याचे काम केले. महाराष्ट्र पुढारलेला आहे अस म्हणताना यासाठी अनेक कारणे आहेत, त्यापैकी नाट्य चळवळ हे महत्वाचे कारण आहे. ३० ते ३५ मिनिटाच्या नाटकात केवळ मनोरंजन होत नाही तर अत्यंत प्रगल्भ पणे प्रबोधन होते ही बाब महत्वपुर्ण आहे. प्रतिष्ठान चे सर्व कार्यकर्ते हे पारंपरिक परंपरा व संस्कृती जपण्याचे प्रामाणिकपणे काम करतात त्याबद्दल असल्याचे सांगुन खासदारांनी सर्वांचे आभार मानले . सुधागड मध्ये आपले वडील व माझे संबंध हे अतिशय जिव्हाळ्याचे आहेत. माझे माहेर हे सुधागड आहे असे मी नेहमी म्हणतो. सुधागड साठी माझ्याकडून जास्तीत जास्त विकासात्मक काम होतील, अशी ग्वाही या वेळी खासदार धैर्यशील पाटील यांनी दिली

धैर्यशील पाटील हे राज्यसभेवर खासदार म्हणून गेले असले तरी सर्वसामान्य जनतेला आपणच खासदार असल्याची भावना आहे, इतके धैर्यशील पाटील हे सर्वसामान्य जनतेशी एकरूप झाले आहेत, त्यांची नाळ जोडली आहे. यानिमित्ताने अशा नेत्याचा पाली नगरीत सत्कार प्रतिष्ठानने आयोजीत केला त्याबद्दल सर्वांचे आभार मानत असल्याचे देसाई म्हणाले.

या वेळी प्रकाशभाऊ देसाई, प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव, तहसीलदार उत्तम कुंभार, राजेश मपारा, गणपत सितापराव, श्रीकांत ठोंबरे, ॲड सुभाष पाटील, रमेश सागळे, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, ज्योत्स्ना प्रकाश देसाई, शिल्पा रवींद्र लिमये, वैशाली मपारा, मंजुषा पाटील, आलाप मेहता, नरेश खाडे, पराग मेहता, रोहन दगडे, सुयोग पाशीलकर, सुशील शिंदे आदींसह मान्यवर पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा व खासदार सत्कार सोहळा यशस्वी होण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव, उपाध्यक्ष अभिजित चांदोरकर, सचिव शरद निकुंभ,सल्लागार प्रकाश कारखानीस, ग. रा. म्हात्रें, तसेच सदस्य सचिन मोरे, सुशील शिंदे, शांताराम सोनार, सागर मिसाळ, संतोष भोईर आदींसह अन्य पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# श्रमसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांकडून वनराई बंधारा

**मुरुड : प्रतिनिधी**

वसंतराव नाईक महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत वाणदे येथे घेण्यात आलेल्या श्रम संस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील जीवन, रुढी, चालिरिती परंपरा यांची माहिती घेतली. या वेळी विद्यार्थ्यांनी वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली.



राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत वाणदे येथे श्रम संस्कार शिबिर कार्यक्रम अधिकारी प्रा . एस. एस बहिरगुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. या निवासी शिबिरात विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात राहून ग्राम जीवन, रुढी, चालिरिती परंपरा यांची ओळख होत असुन श्रम संस्काराची शिदोरी मिळते .

शिबिरार्थींनी परिसर स्वच्छतेसह वावडुंगी–शिघ्रे येथे श्रमदानातून वनराई बंधारा' बांधुन ग्रामस्थांना दिलासा दिला. या वेळी तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ, कृषी सहाय्यक मनोज कदम आणि अतुल उपाध्ये प्रगतीशील शेतकरी प्रमोद मसाल, डॉ. जी.डी.मुनेश्वर व कृषी सहायक मनोज कदम उपस्थित होते .

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग 'पाणी अडवा पाणी जिरवा' या संकल्पनेतून हा वनराई बंधारा बांधण्यात आला. या वनराई बंधाऱ्याच्या माध्यमातून पशु, पक्षी, गुरे तसेच ग्रामस्थांना आणि नदीकाठीवरील रब्बी हंगामातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना पुरेल एवढा पाणी साठा उपलब्ध होईल, असा विश्वास मनिषा भुजबळ यांनी व्यक्त केला.

**पनवेल : राज्याच्या महिला व बालविकास खात्याच्या मंत्रिपदी पुन्हा निवड झाल्याबद्दल आदिती तटकरे यांचे कळंबोली येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे व उणेगावचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के यांनी अभिनंदन केले.**



# प्रशासन गाव की ओर सुशासन सप्ताहानिमित्त जिल्हास्तरीय कार्यशाळा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने देशव्यापी सुशासन सप्ताह सुरू केला आहे. प्रशासन जनतेसाठी काय करते याची माहिती व्हावी, हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा प्रशासनाने सर्वसामान्य जनतेला सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रलंबित कामांचा वेळेत निपटारा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.





सुशासन सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कार्यशाळा सोमवारी (दि.२३) जिल्हा नियोजन समिती सभागृहात झाली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त सनदी अधिकारी सुभाष सोनावणे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, जिल्हा प्रशासन अधिकारी (न.प्र.) श्याम पोशेट्टी, उपविभागीय अधिकारी पेण प्रविण पवार तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले, शहरीकरण जरी वाढत असले, तरी गावांमध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ राहत असतात. येणाऱ्या तक्रारींचे निराकरण करणे, हे प्रमुख काम आहे. त्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करणे, सार्वजनिक तक्रारी निर्गत करणे, ऑनलाईन सेवेमधील विलंबितता टाळून, त्या पुरविणे आदी गतीने कामे करावीत. आपले सरकार पोर्टल तसेच सेवा हमीमधील अपिले वेळेत काम पूर्ण करुन विहित वेळेत तक्रारींचा निपटारा करा त्याचबरोबर गतीने कामे करावीत, अशा सूचनांही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

सेवानिवृत्त सनदी अधिकारी सुभाष सोनावणे मार्गदर्शन करताना म्हणाले, कामकाज करताना पारदर्शकता असली पाहिजे आणि कामकाज विहित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. कार्यालयीन प्रलंबितता दूर करणे, हा या सप्ताहाचा मूळ उद्देश आहे. तक्रारदारांच्या टपालासाठी वर्गीकरण करा. त्यानुसार तक्रारींचे प्राधान्यक्रम ठरवा, त्यासाठी कालबध्द कार्यक्रम राबवा. तक्रारदारांचे अर्ज प्रथम निर्गत करणे आवश्यक आहे.उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके म्हणाले की, 'प्रशासन गाव की ओर ही' संकल्पना घेऊन सुशासन सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

या कार्यशाळेवेळी प्रत्येक शासकीय विभागांनी मागील व पुढील वर्षात जिल्ह्यात सुशासन उपक्रमांतर्गत राबविलेल्या व राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपस्थितांना दाखविण्यात आली.

या कार्यशाळेला उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण निर्मला कुचिक, लिड बँक मॅनेजर विजय कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी पाणी पुरवठा शुभांगी नाखले आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# ग्लोकल कम्युनिकेशनचे भास्कर तरे यांचा सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

ग्लोकल कम्युनिकेशन या संस्थेचे प्रमुख भास्कर तरे यांचा स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट कडून सन्मान करण्यात आला

कराड येथे राज्यस्तरीय प्राइड ऑफ स्पंदन अवॉर्ड सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात ग्लोकल कम्युनिकेशन संस्थेचा प्राइड ऑफ स्पंदन अवॉर्ड देवून सन्मान करण्यात आला.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संदीप डाकवे, डॉ. नीलकंठ धारेश्वर महाराज, वैद्यकीय क्षेत्रात कार्य करणारे मंगेश चिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.




## CHANGE OF NAME

We the undersigned **MR. SWARUP DASHRATH PATIL** (Old name) Residing At 156/4, Wing F, Shiv Om Complex, Kacheri Road, Mudre Budruk, Karjat, Dist. Raigad. (Maharashtra) Pin - 410201.

We Changed our Name by the Affidavit No. **245204175126860015 8244, dated 18/12/2024.** So we here after called by new Name **MR. SWARUP DASHARATH PATIL**

Sign. by New Name
MR. SWARUP DASHARATH PATIL
156/4, Wing F, Shiv Om Complex, Kacheri Road,
Mudre Budruk, Karjat, Dist. Raigad.
(Maharashtra) Pin - 410201.


# केळी वेफर्स उद्योगात माणगावच्या शेतकऱ्याचे पाऊल

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत प्रकल्पाचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील बागायतदार शेतकऱ्याने आपल्या स्वतःच्या केळीच्या बागेतून उत्पादित होणारी केळी बाजारपेठेत विक्रीसाठी न पाठवता त्यावर इथेच प्रक्रिया करून केळी वेफर्स तयार करण्यासाठी पुढे टाकलेले पाऊल प्रगतीचे पाऊल ठरले.

मौजे कोस्ते खुर्द येथे केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजने अंतर्गत लाभार्थी दिलीप गोविंद गोपाळ यांच्या गोपाळ केळी वेफर्स या प्रकल्पाचे उद्घाटन (दि. ११) तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांचे हस्ते करण्यात आले.



या योजने अंतर्गत घेण्यात आलेला हा प्रकल्प तालुक्यातील नाविन्यपूर्ण प्रकल्प असून दिलीप गोपाळ यांचे १० एकर क्षेत्रावर केळीचे उत्पादन घेत आहेत. केळीचे बागेतून आलेले उत्पादन मुंबई, पुणे इथे विक्री करतात परंतु अशी विक्री करण्यापेक्षा त्यावर प्रक्रिया करून विक्री केली तर जास्त नफा मिळतो असा अनुभव असल्याने त्यांनी या योजनेचा लाभ घेतला. प्रक्रिया केलेला माल मुंबई व पुणे येथून कोकणामध्ये येणारे पर्यटक मोठ्या प्रमाणात खरेदी करतात त्यामुळे त्यांच्या या उद्योगाला जास्त चालना मिळेल असा त्यांना विश्वास वाटत आहे.

कृषि विभागामार्फत त्यांना कृषी सहाय्यक प्रतिभा खिलारी यांनी या योजनेची माहिती दिली. या योजने अंतर्गत त्यांनी केळी पासून प्रक्रिया करून केळीचे वेफर्स बनवण्याची मशिनरी खरेदी केली. त्यांना या योजनेंतर्गत ३५ टक्के अनुदान मिळणार आहे तसेच ९० टक्के बँक लोन देण्यात आले आहे. अशा प्रकारे माणगाव तालुक्यातील हा नाविन्यपूर्ण प्रकल्प असून तालुक्यातील इतर नवीन उद्योजकांनी तसेच महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा तसेच या प्रकल्पाला भेट द्यावी असे तालुका कृषी अधिकारी यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. कृषी पर्यवेक्षक एस.आर.नलावडे आणि कृषी सहाय्यक पी.एम खिलारी, ज्योती जाधवर, सौरभ तरटे, अजिंक्य घोलप, हर्षाली यादव यांच्यासह कृषी सहायक उपस्थित होते.


Adv.D.B.Gupta
CNR MHLC04006152024

## जाहीर नोटीस

क्र.11354

**कामगार न्यायालयाचे कार्यालय,ऑफिस कॉम्प्लेक्स M.I.D.C Bldg., दुसरा आणि तिसरा मजला, मुलुंड चेक नाका, ठाणे (प.) 400 604.**
**ठाणे येथील कामगार न्यायालय, ठाणे पूर्व**
**श्रीमती ए.ए.पाटील, न्यायाधीश,**
**१ले कामगार न्यायालयात**
**पुनर्गठन A (WCA) NO. 225/1-51/2024**
**A(WCA) क्र.357/C-52/2019**

**श्री. गुलाम नबी** ....अर्जदार
**विरूध्द**
**श्री. सादिक निसार कुरेशी आणि अन्य 2** ...विरुद्ध पक्ष

**प्रति,**
**१) श्री. सादिक कुरेशी**
**पत्ताः पोलीस स्टेशन माजिद मोहल्ला, मदिना कॉम्प्लेक्स, 1 ला मजला, फ्लॅट क्र. 3, ता. उरण, जि. रायगड 400702.**

**२) श्री.मो.रईस सईद खान**
**पत्ताः खोली क्रमांक ९६२, काशीबाई चाळ, बिल्डिंग, एसटी जवळ. डेपो, चारफाटा, कारंजा रोड, उरण.**

**३) बजाज अलियान्झ जनरल इं. कंपनी लि.**
**पत्ताः चौथा मजला, सन मॅग्नेटिक, न. तीन हात नाका, न.नवीन आरटीओ, लुईस वाडी, ठाणे 400602**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराने या न्यायालयात पुनर्गठन अर्ज क्रमांक A (WCA) क्र. 225/I-51/2024 A(WCA) क्रमांक 357/C- 52/2019 मध्ये पुनर्गठनासाठी अर्ज दाखल केला आहे, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरण दि. 07/01/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता किंवा अशा वेळी लगेचच सुनावणीसाठी घेण्यात येईल.

तुम्हाला याद्वारे व्यक्तीशः किंवा तुमच्या वतीने उपरोक्त वेळी आणि ठिकाणी उपस्थित राहण्याचा अधिकार असलेल्या योग्य अधिकृत व्यक्तीने हजर राहणे आवश्यक आहे तसेच अर्जदारास का मंजूर केले जाऊ नये याचे कारण दाखवणे आवश्यक आहे.

सदरची नोटीस कोर्टाच्या आदेशाने व शिक्क्याने दिली आहे.

Policy No. OC-19-4172-1803-00000365
Valid From 30/01/2019 to 29/01/2020

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
सचिव,
कामगार न्यायालय ठाणे.



**परिशिष्ट क्र. १६**
**(उपविधी क्र. ३५ अन्वये )**

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता, नवीन पनवेल, या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर/गाळा/बंगला क्र. ...........धारण करणाऱ्या श्री. प्रफुल्ल नागेश तरे यांचे तारीख २८/१०/२०२४ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/ हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० वा. ते दुपारी ४.०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल
दिनांक : २३/१२/२०२४

**सही/-**
सचिव
सरकारी नोकरी गृहनिर्माण संस्था मर्यादित
सेक्टर २, नवीन पनवेल

# हार्बर रेल्वेमार्गाला सरकत्या जिन्यांची प्रतीक्षा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सध्या बहुतांश ज्येष्ठ नागरिकांना, त्यात खास करून महिलांना, जिने चढण्याच्या्या त्रास होत आहे. त्यामुळे जिने चढून जाणे ते टाळतातच, मात्र नवी मुंबईतील हार्बर रेल्वे मार्गावरील सर्वच स्थानकात जिने चढून जाण्याशिवाय पर्यायच नाही. कारण इथे कुठेच सरकते जिने बसवण्यात आलेले नाहीत.

या मार्गावरील रेल्वेस्थानकात सरकत्या जिण्याची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या मार्गावर सरकत्या जिण्याची सुविधा उपलब्ध होईल, अशी आशा या मार्गावरील प्रवाशांनी व्यक्त केली आहे. नवी मुंबईत वाशी ते ठाणे, ठाणे ते नेरूळ, ठाणे ते पनवेल वाशी ते पनवेल सोबत आत्ता तर नेरूळ ते उरण हा रेल्वे मार्ग ही सुरू झाला आहे. या मार्गावरील रेल्वेस्थानकातून




दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. यात महिला ज्येष्ठ नागरिक यांचा ही समावेश मोठ्या प्रमाणत आहे. या प्रवाशांसाठी सरकत्या जिण्याची व्यवस्था या मार्गावरील रेल्वेस्थानकात असावी, अशी मागणी अनेक वर्षापासून प्रवाशी, ज्येष्ठ नागरिक संघटना करत आहेत.

नवी मुंबईतील हार्बरच्या वाशी ते ठाणे मार्गावर एकूण नऊ स्थानक आहेत. यात दिघा या नव्याने उभारलेल्या स्थानकात सरकत्या जिण्याची व्यवस्था आहे, मात्र इतर स्थानकात सरकत्या जिण्याची प्रतीक्षा कायम आहे. वाशी ते पनवेलदरम्यान ११ स्थानक आहेत. इथं कुठेही सरकते जिने नाहीत.

नेरूळ स्थानकात तीन मार्गावरील रेल्वे मार्ग एकत्र येत आहेत. त्यामुळे हा मार्ग सध्या जंक्शनच्या स्वरूपात नावारूपास आला आहे. इथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. त्यामुळे या स्थानकात सर्वात आधी सरकते जिने बसवावेत यासाठी या स्थानकाची पाहणी सिडकोच्या वतीने करण्यात आली होती, असे राजेसाहेब राऊत यांनी सांगितले.

> **वयस्कर व्यक्तींना जिने चढून जाताना त्रास सहन करावा लागतो त्यामुळे सर्वच रेल्वेस्थानकात सरकत्या जिन्यांची सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी. खासकरून जेष्ठ नागरिक, महिला यांना गुडघेदुखीचा त्रास होतच असतो. त्यात जिने चढून जाणे म्हणजे त्यांच्या त्रासात भर आहे. त्यामुळे सर्वच रेल्वेस्थानकात सरकते जिने बसवणे गरजेचे आहे.**
> **–आबा रणवरे, ज्येष्ठ नागरिक, जुईनगर**

## वाशी-चोपडा एसटी बस पुन्हा झाली सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील खान्देशवासियांसाठी सोयीस्कर असणारी वाशी – चोपडा एसटी बस पुन्हा सुरू करण्यात आली. स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांनी यासाठी विशेष सहकार्य केले.

खान्देशातील चोपडा, जळगाव धुळे, नाशिक, इगतपुरी येथील नवी मुंबईत राहणाऱ्या रहिवाश्यांसाठी वाशी– चोपडा ही एकमेव एसटी बस होती, मात्र ती अचानक महिनाभरापासून बंद झाल्याने खान्देशात ये–जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय झाली होती. ही बाब विकास सोरटे, सुरेश बिरारी व दिलिप दुसाने यांनी आमदार मंदा म्हात्रे यांना सांगितली.



आमदार म्हात्रे यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांना सदर गाडी पुन्हा सुरू करण्याकरीता पत्र दिले. महामंडळाचे वाहतुक विभागाचे मुख्य अधिकारी हसबणिस यांच्या सोबत शासकीय स्तरावर पाठपुरावा करून २० डिसेंबरपासुन बस सुरू करण्यात आली.

## महिलेची हत्या करून चोरी करणारा ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

एका महिलेची हत्या करून जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला अडीच महिन्यानंतर गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने अथक मेहनत घेवून ताब्यात घेतल्याने या खुनाची उकल झाली आहे. ही पनवेल तालुक्यातील वलप गावामध्ये घडली होती.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील वलप गावातील संगिता राजेंद्र आगवणे या खाजगी शिकवणीचे क्लास संपवुन घरी पायी चालत जात असताना कोणीतरी अज्ञात आरोपी इसमाने जबरी चोरी करण्याचे उद्देशाने त्यांचा गळा आवळुन खुन करून त्यांचे अंगावरील सोन्याचे मंगळसुत्र, कानातील झुमके, सोनसाखळया, पोको कंपनीचा मोबाईल आणि पर्स असे १ लाख ९५ हजार ८५० रूपये किंमतीचे ऐवज चोरी करून नेले होते. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पनवेल तालुका पोलिसांचे पथक तसेच गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे पथक समांतर करत होते.

या गुन्हयाचा तांत्रिक तपास करत असताना परिसरातील वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या कामगारांची आणि लोकांची माहिती घेतली असता यातील एक व्यक्ती हा या घटनेनंतर मध्यप्रदेशला निघून गेल्याचे निष्पन्न झाले. यानुसार पोलिसांचे एक पथक त्या ठिकाणी रवाना झाले आणि त्यांनी तेथून आरोपी शरद घनश्याम साहु याला ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्यानुसार त्याला पनवेल येथे आणण्यात आले आहे.

## खारघरजवळील घोलवाडी येथे सॅनिटरी पॅड वितरण

**पनवेल : वार्ताहर**

मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छता याविषयी जागरूकता वाढवण्यासाठी पार्थ पवार फाउंडेशनने झिरो फाउंडेशनच्या सहकार्याने खारघरच्या घोलवाडी गावात १९ डिसेंबर रोजी सॅनिटरी पॅड वितरण अभियान आयोजित केले होते.

या कार्यक्रमाला पार्थ पवार फाउंडेशनच्या व्यवस्थापिका रुची कौर बनुशाली, झिरो फाउंडेशनचे संस्थापक मुस्सदिफ सिराज मोडक, माजी नगरसेविका मंजुळा कटकराई, नितेश पाटील यांची उपस्थिती लाभली होती.

अभियानादरम्यान महिलांना आणि किशोरवयीन मुलींना सैनिटरी पॅड वितरित करुन मासिक पाळी स्वच्छतेच्या व्यवस्थापनावर चर्चा करण्यात येऊन मासिक पाळीशी संबंधित सामाजिक अंधश्रद्धा दूर करण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण भागातील स्वच्छता साधनांची कमतरता दूर करून महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. झिरो फाउंडेशनचे संस्थापक मुस्सदिफ सिराज मोडक यांनी या



कार्यक्रमात बोलताना सांगितले की मासिक पाळी स्वच्छता हा केवळ महिलांचा विषय नाही, तर तो संपूर्ण समाजाचा मुद्दा आहे.

या अभियानाद्वारे आम्ही जागरूकता निर्माण करणे आणि प्रत्येक महिलेला मूलभूत स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. पार्थ पवार फाउंडेशनच्या व्यवस्थापिका रुची कौर बनुशाली म्हणाल्या, महिलांच्या सशक्तीकरणासाठी हे पाऊल खूप महत्त्वाचे आहे. आरोग्य आणि स्वच्छतेसंदर्भातील गंभीर आव्हानांवर काम करणे अत्यावश्यक आहे. त्यांनी झिरो फाउंडेशन आणि सर्व सहभागींचे यासाठी आभार मानले.

समाजसेवक नितेश पाटील यांनी ग्रामीण भागात मासिक पाळी स्वच्छतेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी आणि उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी सतत प्रयत्न करण्याची गरज अधोरेखित केली. माजी नगरसेविका मंजुळा कटकराई यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, स्वच्छतेबद्दल जागरूकता वाढवणे आणि सॅनिटरी पॅडसारखी संसाधने उपलब्ध करून देणे हे महिलांच्या सशक्तीकरणासाठी आणि आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. स्थानिकांनी या उपक्रमाचे जोरदार स्वागत करुन लाभार्थ्यांनी या दतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## महालक्ष्मी सरसमध्ये सावंतवाडीच्या खेळणी, वस्तूंचे आकर्षण

**पनवेल : प्रतिनिधी**

उमेद अभियानाच्या महालक्ष्मी सरस २०२४मध्ये सावंतवाडीच्या लाकडी खेळणी व गृहोपयोगी वस्तूंच्या स्टॉलवर रंगीबेरंगी खेळण्यांचे लहान मुलांना आकर्षण वाटत असल्याने त्यांची व पालकांची गर्दी दिसत होती

ग्रामीण महिलांच्या कौशल्याला प्रोत्साहन देत, त्यांच्या व्यवसायांना चालना देणाऱ्या उमेद अभियानाच्या महालक्ष्मी सरस २०२४ प्रदर्शन व विक्रीचे भव्य प्रदर्शन सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई याठिकाणी भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनात घे भरारी–मला पंख मिळाले या कार्यक्रमात सहभागी उमेद अभियानाच्या महिलांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या प्रदर्शनात ४००पेक्षा अधिक स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यामध्ये हातमाग, कलाकुसर, हस्तकला, साड्या, कपडे, मसाले, सजावटीच्या वस्तू, तसेच विविध गृहपयोगी वस्तूंचा समावेश आहे.



तसेच, महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या अस्सल खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेण्यासाठी ७० भव्य स्टॉल्सचे फूड कोर्ट उभारण्यात आले आहेत.

या प्रदर्शनात ग्रामीण महिलांनी आपल्या कौशल्याने साकारलेल्या उत्पादनांचा विशेष ठसा उमटवला आहे. या प्रदर्शनाला रोज हजारो नागरिकांनी भेट देतांना दिसत आहेत. यामध्ये कोकणातील सावंतवाडीच्या नेचर वुडच्या सोनुले (डिंगणकर) यांच्या लाकडी खेळणी व गृहोपयोगी वस्तूंना मोठ्या प्रमाणात मागणी दिसून आली. मिसेस सोनुले यांनी आम्ही सावंतवाडीला यालाकडी वस्तू व खेळणी बनवतो. आमचे गोवंडी येथे ही विक्री केंद्र असल्याची माहिती दिली.

महालक्ष्मी सरस २०२४ हे प्रदर्शन हे एक अनोखा उत्सव आहे असेच म्हणायला हवे. वेगवेगळ्या राज्यातीला कलाकारांनी बनवलेल्या वस्तू, कपडे पहाण्यासाठी व घेण्यासाठी तरुणाईची गर्दी दिसत होती. खाद्य पदार्थाच्या स्टॉलमध्ये आपल्या ग्रामीण भागातील पोपटीला ही मोठी मागणी दिसून आली. त्या बरोबरच व्हेज आणि नानव्हेज पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी दर्दी खवययांची गर्दी दिसत होती. ग्रामीण संस्कृतीचा आणि कलेचा अनुभव घेण्यासाठी एक पर्वणी आहे. संपूर्ण वातानुकूलित व्यवस्थेमुळे खरेदीसाठी अतिशय सुखद वातावरण आहे.

## कांद्याच्या दरात घसरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर चढेच होते. घाऊक बाजारात साठी गाठलेले कांद्याचे दर आता आवाक्यात येत आहेत. घाऊक बाजारात आधी जुना कांदा प्रतिकिलो कांदा ५०–६० रुपयांवर होता, मात्र आता जुना कांदा तुरळक असून नवीन कांदा अधिक प्रमाणात दाखल होत आहे. त्यामुळे नवीन कांद्याच्या दरात प्रतिकिलो १०–१५ रुपयांनी घट झाली आहे.

घाऊक बाजारात नव्या कांद्याची २०–३० रुपयांना विक्री होत आहे. एपीएमसी बाजारात उन्हाळी आणि पावसाळी अशा दोन कांद्याचा हंगाम असतो. नोव्हेंबरमध्ये पावसाळी नवीन कांदा दाखल होत असतो, मात्र परतीच्या पावसाने राज्यातील नवीन



कांद्याच्या उत्पादनावर पाणी फेरले होते. त्यामुळे नवीन कांद्याचा हंगाम लांबला आणि जुने कांदे वरचढ ठरत होते. परिणामी कांद्याच्या दरात सातत्याने वाढ होत होती.

गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर चढेच होते. जुना कांदा घाऊक बाजारात प्रतिकिलो ७० रुपयांपर्यंत गेला होता. तर नवीन कांदे ही वरचढ ठरत होते. नवीन कांदा ५०–५५ रुपयांनी विक्री होत होता. मात्र बाजारात राज्यातील नवीन कांद्याची आवक वाढली आहे. नवीन कांदा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने दर गडगडत आहेत, अशी माहिती व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली आहे.

## नवरंग साहित्य चर्चा आणि बकुळबाग मासिक कविसंमेलन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवरंग साहित्य, संस्कृती आणि कला मंडळाच्या वतीने दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी सीवूड्स येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात प्रसिद्ध लेखक – नाटककार कवी गज आनन म्हात्रे यांच्या आगरी भाषा सौंदर्य ज्ञानेश्वरीतील आगरी शब्दांचे आगर या संशोधनपर पुस्तकावर चर्चा करण्यासाठी ख्यातनाम साहित्यिक डॉ. अजित मगदूम यांच्या अध्यक्षतेखाली नवरंग साहित्य चर्चा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख वक्ते नवी मुंबई येथील प्रसिद्ध इतिहास अभ्यासक श्री जयवंत पाटील यांनी ज्ञानेश्वरीतील ओव्यांमध्ये आगरी शब्दांची उत्पत्ती कशी झाली याबद्दल अभ्यासपूर्ण विवेचन केले. तर दुसरे वक्ते संत साहित्याचे अभ्यासक डॉ. किरण जोशी (कळंबोली) यांनी ज्ञानेश्वरीतील प्राकृत भाषा ही सर्व सामान्यांची



बोली भाषा होती, त्या अनुषंगाने काही बोली भाषा ज्ञानेश्वरीत आहेत. त्यापैकी आगरी बोली ही अतिशय रसाळ, सौंदर्यवती आणि ग्रामीण जीवन जगणारी भाषा ज्ञानेश्वरीचा भाग झाली, असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अजित मगदूम म्हणाले की ज्ञानेश्वरीतील भाषांचा सांस्कृतिक अंगाने अभ्यास करणे हे सोपे काम नाही, पण गज आनन म्हात्रे यांनी हे शिवधनुष्य पेलले. आणि परिश्रमपूर्वक संशोधन करून या पुस्तकाची निर्मिती केली. त्यामुळे एकूणच मराठी साहित्य प्रांतात हा महत्वाचा ग्रंथ आहे. प्रारंभी नवरंगचे अध्यक्ष गज आनन म्हात्रे यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे शाल आणि ग्रंथ देऊन स्वागत केले. आणि या पुस्तकाबद्दलची आपली भूमिका सविस्तर मांडली.

या वेळी नवरंग एकांकिका महोत्सव २०२४ यात नवरंगने सादर केलेल्या महानंदा या एकांकिकेत भूमिका करणाऱ्या कलावंतांचा डॉ. अजित मगदूम यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. समारंभाच्या तिसऱ्या टप्प्यात प्रसिद्ध कवी रामबंधू अडांगले यांच्या अध्यक्षतेखाली बकुळबाग कवी संमेलन झाले. यात मीनाक्षी तांडेल, गज आनन म्हात्रे, राजेंद्र बनसोडे, मिलिंद कल्याणकर, पाकिजा आत्तार आणि अनिल मुनघाटे या कवींनी आपल्या कविता सादर केल्या. या कवी संमेलनाचे अध्यक्ष रामबंधू यांनी आपली कविता सादर करून समारोप केला.

असा हा त्रिवेणी साहित्य सोहळा अतिशय देखण्या स्वरूपात संपन्न झाला. या सबंध सोहळ्याचे सूत्र संचालन डॉ. कल्पना मुनघाटे यांनी आपल्या ओघवत्या शैलीतून केले. शेवटी नवरंगच्या खजिनदार आणि लेखिका पाकीजा आत्तार यांनी आभार प्रदर्शन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नवरंगचे कार्यवाह घनश्याम परकाळे आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांनी परिश्रम घेतले.

## पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनतर्फे जागतिक ध्यान दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक ध्यान दिनानिमित्त, पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सने हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन केले होते, ज्याचा उद्देश हृदयस्थ ध्यान आणि आंतरिक शांतीच्या सरावाला चालना देण्याच्या उद्देशाने होता. TAPAS-PCEद्वारे आयोजित, दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात आजच्या वेगवान जगात संतुलन आणि शांतता प्राप्त करण्यासाठी एक साधन म्हणून ध्यानाच्या महत्त्वावर भर देण्यात आला.

डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे सीईओ म्हणाले की, वैयक्तिक वाढीसाठी आणि आंतरिक शांततेसाठी मी ध्यानाच्या महत्त्वावर नेहमीच भर दिला आहे. मनाच्या शांततेतूनच आपण जागृत होतो. खरी क्षमता, मानसिक स्पष्टता मिळवा आणि चिरस्थायी मनः शांती आणणारी सुसंवाद जोपासा.

दाजी कमलेश डी. पटेल, हार्टफुलनेस इन्स्टिट्यूटचे जागतिक मार्गदर्शक म्हणाले की: ध्यान ही आपल्या अस्तित्वातील सखोल पैलू उघडण्याची गुरुकिल्ली आहे. यामुळे मनाला स्पष्टता, हृदयाला शांती मिळते आणि वैयक्तिक




वाढ शक्य होते. नियमितपणे सराव, आम्ही दैनंदिन जीवनातील विचलनाच्या पलीकडे जातो आणि आतील शांततेशी जोडतो, जिथे खरी शांतता आणि शहाणपण राहते.

अंधारावर प्रकाशाचा विजय आणि अराजकतेवर शांततेचे प्रतीक असलेल्या दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पीआयएमएसआरचे कार्यकारी संचालक डॉ.आर.चंद्रन, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप जोशी, पिल्लई एचओसी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डब्लू.बकाल, पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनच्या संचालक पीआर डॉ. निवेदिता श्रेयांस, डॉ. प्रा. शिल्पा मोंडकर, TAPAS-PCEच्या समन्वयक, मेघना प्रधान, सीए आणि हार्टफुलनेस ट्रेनर, मुकेश पटेल, हार्टफुलनेसचे झोनल को–ऑर्डिनेटर आणि श्री विनायक पाटील, एबीपी माझाचे वरिष्ठ रिपोर्टर हे मान्यवर मान्यवर होते ज्यांनी मंचावर उपस्थित राहून दिवसासाठी एक प्रेरणादायी टोन सेट केला. त्यांच्या उपस्थितीने केवळ उबदारपणाच वाढवला नाही तर या प्रसंगाचे महत्त्वही वाढले. डॉ. आर चंद्रन यांनी एक अंतर्दृष्टीपूर्ण स्वागत भाषण केले, उपस्थितांचे आभार व्यक्त केले आणि हृदयस्पर्शी संदेश दूरवर पसरवण्यास मदत केल्याबद्दल मीडिया पार्टनर, एबीपी माझाच्या समर्थनाची कबुली दिली.

शिक्षणतज्ञ डॉ. निवेदिता श्रेयन्स यांनी मार्गदर्शन केलेल्या एका आकर्षक हार्टफुलनेस मेडिटेशन सत्राने दिवसाची सांगता झाली, ज्याने सहभागींना आराम आणि मनापासून ध्यानाचा अनुभव दिला. कार्यक्रम यशस्वी करणारे पाहुणे, आयोजक स्वयंसेवक आणि मीडिया पार्टनर्स यांच्या प्रयत्नांची दखल घेत आभार मानले.

# श्रीवर्धनमध्ये क्रीडा संकुलाची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथील वाढत्या पर्यटन आणि शहरीकरणामुळे येथे पर्यटन व्यवसायातील अनेक नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. नापीक शेतीच्या जागेचा योग्य उपयोग करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी आपली शेती पर्यटन व्यवसायासाठी वापरण्याचा निर्णय घेतला. काहींनी रिसॉर्ट्स आणि रेस्टॉरंट्स उभारले, तर काहींनी जमीनीची विक्री केली. परिणामी, श्रीवर्धन आता निवासी संकुले, व्यापारी गाळे, रेस्टॉरंट्स आणि रिसॉर्ट्स यांनी व्यापलेला आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांद्वारे पर्यटनाच्या वाढीच्या सोबतीला क्रीडा संकुलाची आवश्यकता जोर धरत आहे.

स्थानिक खेळाडूंनी क्रीडा संकुल उभारण्याची मागणी केली आहे. सध्या, श्रीवर्धनमधील उदयोन्मुख तरुणांना क्रीडापटू होण्यासाठी मोकळ्या मैदानाची तंगी भासत आहे. क्रिकेट, कबड्डी आणि खो-खो यासारख्या खेळांच्या सरावासाठी, खेळाडूंना तीव्र कसरत करण्यासाठीच मोकळी जागा मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो.

या बाबतीत, श्रीवर्धनमधील काही खेळाडूंनी नापीक शेतीच्या जागेवर शेतकऱ्यांच्या परवानगीने मैदान तयार करुन सराव केला आणि त्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे, श्रीवर्धनमधील अनेक क्रिकेट, कबड्डी आणि खो-खो खेळाडू राज्यस्तरीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करत आहेत, काही खेळाडू राष्ट्रीय संघांमध्ये स्थान मिळवण्यापर्यंत पोहचले आहेत.

**श्रीवर्धन नगर परिषदेच्या नियोजन आराखड्यात समुद्र किनाऱ्याजवळ क्रीडा संकुलासाठी दोन ते अडीच एकर जागा आरक्षित करण्यात आली आहे. नगरपरिषद कडून ही क्रीडा संकुलाची जागा टप्याटप्याने विकसित केली जाईल, ज्यामुळे श्रीवर्धनच्या तरुणांसाठी भविष्य उज्वल होईल.**

**-विराज लबडे, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगर परिषद**

# धर्ती आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान प्रभावीप्रणे राबवा -डॉ.कपूर

**रायगड : रामप्रहर वृत्त**



धर्ती आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेचा लाभ जिल्ह्यातील आदिवांना बांधवांना देण्यासाठी जिल्ह्य प्रशासनाने प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश अतिरिक्त सचिव, आदिवासी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार डॉ. नवल जीत कपूर यांनी सोमवारी (दि.२३) दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आत्माराम धाबे, उपजिल्हाकारी (पुनर्वसन) भारत वाघमारे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त सचिव, डॉ.नवल जीत कपूर म्हणाले की, आदिवासी बांधवांसाठी प्रधानमंत्री जनमन योजना या नावाने १५ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरू झालेल्या योजनेचे २ ऑक्टोबर २०२४ रोजी धर्ती आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान योजना नावाने नामांतर करण्यात आले आहे. आदिवासी बांधवांच्या कल्याणासाठी ही एक महत्वाकांक्षी योजना असून या योजनेचा आदिवासी बांधवांना लाभ द्यावा. जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचा विकास व्हावा, त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात याकरिता केंद्र व राज्य शासन अनेक योजना राबवित आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक आदिवासी बांधवांना मिळावा याकरिता संबधित विभागातील अधिकाऱ्यांनी महिन्यातील एक दिवस या योजनेसाठी द्यावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. ज्या आदिवासी बांधवांचे बँक खात्याशी आधार संलग्न नसेल तर त्यांचा सर्व्हे करुन ते काम लवकरात लवकर पूर्ण करावे, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

आदिवासीच्या विविध योजनांसाठी असलेले अनुदान वाढवून देण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. या योजनेविषयी काही अडचणी असतील तर अधिकारी वर्गाने माझ्याकडे संपर्क करावा, असे आवाहन त्यांनी अधिकाऱ्यांना केले. या वेळी उपस्थितांना दूरदृष्य प्रणालीद्वारे धर्ती आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान योजनेची माहिती देण्यात आली.

# मंत्री भरत गोगावलेंचे नागोठण्यात स्वागत; कार्यकर्त्यांकडून अभिनंदन

**नागोठणे : बातमीदार**



गरिबांचे शेठ म्हणजे भरतशेठ अशी ओळख असलेले शिवसनेचे महाड मधील आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले हे मंत्री झाल्यानंतर प्रथमच रायगड जिल्ह्यात येणार असल्याचा मेसेज मुख्य कार्यकर्त्यांना मिळाल्यानंतर रविवारी (दि.२२) खारघर (पनवेल) ते महाडदरम्यान ठिकठिकाणी मंत्री भरतशेठ गोगावले यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

त्याच अनुषंगाने शिवसेना रोहा उपतालुका प्रमुख युवा नेते मनोज खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांनी नामदार भरतशेठ गोगावले यांचे नागोठणे येथील मुरावाडी नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक व कानसई येथे फटाकांच्या अतिषबाजीत जल्लोषात स्वागत करून शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

या वेळी जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, युवा नेते विकासशेठ गोगावले, रजिप सदस्य रविशेठ देशमुख, सदस्य युवा सेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे, रजिपचे माजी सदस्य चंद्रकांत कळंबे रोहा ता. प्रमुख मनोजकुमार शिंदे,उपतालुका प्रमुख मनोज खांडेकर, युवा नेते सचिन भोसले, युवा सेना ता. सचिव मंदार कोतवाल, महिला नेत्या वर्षा सहस्त्रबुद्धे, नागोठणे विभाग प्रमुख प्रविण ताडकर, उपविभाग प्रमुख आकाश मढवी, शहर प्रमुख संतोष चितळकर, प्रकाश मोरे, मंगेश रावकर, संजय नांगरे, ऐनघर ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र मोहीते, यशवंत शिद, भरत भोईर, नामदेव शिद, आमडोशी शाखा प्रमुख रोशन जांबेकर, महेश जाधव, केतन कामथे, विराज दळवी, बाळू जांबेकर, रुपेश जांबेकर, बाबू घाग, जयेश जाधव, संजय कणघरे, निलेश साळवी, हरेश मोरे, मयूर ढाणे, मनोज भोसले, लालचंद शिद आदिंसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

नामदार भरतशेठ गोगावले यांचे नागोठणे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आगमन झाल्यानंतर त्यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला तदनंतर कार्यकर्त्यांनी त्याचे जोरदार स्वागत केले. त्यानंतर नामदार भरतशेठ गोगावले हे महामार्गवरील कानसई येथील हॉटेल बिजली येथे आले. त्या ठिकाणीदेखील ना. भरत गोगावले यांचे युवा नेते मनोज खांडेकर यांनी जल्लोषात स्वागत केले.

हॉटेल बिजली येथे युवा नेते मनोज खांडेकर यांनी शाकाहारी व मांसाहारी भोजनाची चोख व्यवस्था केली होती. नामदार गोगावले यांच्या सह सर्व कार्यकर्त्यांनी भोजन केल्यानंतर नामदार गोगावले महाडकडे रवाना झाले.

# चाऱ्याच्या शोधात मेंढपाळांची भटकंती

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी मेंढपाळांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात आगमन जरी होत असले तरीसुद्धा चाऱ्याच्या आभावाने मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत आहे. ही वस्तूस्थिती सध्या तालुक्याच्या ठिकाणी निर्माण झाली आहे.

पुर्वी कोकणात मोठ्या प्रमाणात चारा असायचे, मात्र गेल्या काही वर्षात औद्योगिकरणांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरल्याने शिवाय जंगले नामशेष होत असल्यामुळे, त्याचबरोबर पावसाला संपताच वणवे मोठ्या प्रमाणात लागले जात असल्यामुळे,या सर्व कारणावरुन मेंढ्यावर उपासमारीचे संकट निर्माण झाले आहे.त्याच बरोबर पिण्याच्या पाण्याच्या समस्या मोठ्या तिव्रतेने जाणवत आहे. पुर्वी माळरान आणि डोंगराच्या परिसरात काटेरी वनस्पती मोठ्या प्रमाणात असायचे, हेच अन्न म्हणून शेळ्या, मेंढ्या भक्षण करीत असे, यामुळे दुध उत्पादन वाढ होत होती, मात्र चाऱ्याच्या अभावाने आम्ही आर्थिक संकटात सापडत आहोत.

पशुधन जगविण्यासाठी आम्ही कोकणाच्या परिसरात भटकंती करीत असतो. याचबरोबर आमचे जितराबाचे लोंढेच्या लोंढे आमच्या बरोबर असून, शेळ्या मेंढ्यांच्या घोळक्यात घोडे, कुत्रे, कोंबड्या असा लवाजमा त्यांच्या जवळ असतो. जागा मिळेल तिथे मुक्काम आणी सकाळी पुढे प्रवासाला जाणे, असा नित्यक्रम मे महीन्यांच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत चालत असतो, पावसाळा सुरू होताच आम्ही मंडळी गावी पोचतात, असे मत घाटमाथ्यावरून आलेल्या मेंढपाळांनी व्यक्त केले.



# म्हसळा श्रीवर्धन येथे गझल मुशायरा मैफिल

**माणगाव : प्रतिनिधी**



ललित कला फाउंडेशन, ठाणे यांनी आयोजित केलेल्या काव्य, गझल मुशायरा महफिल-ए -सुखनआणि कवितेच्या घरातर्फे कवितेवर बोलू काही चा उपक्रम १४ आणि १५ डिसेंबर रोजी म्हसळा येथील न्यु इंग्लिश स्कुलमध्ये झाला.

अध्यक्ष रोहिदास पोटे व उद्‌घाटक शिवशाहीर कमलाकर करडे आणि मुज्फर गफुर सय्यद यांची भाषणे व मनोगत यांनी कार्यक्रमाला सुरुवात करून दिली. राणा दौड, राजू आठवले व नायाब नागेश नायडू यांनी मंत्रमुग्ध केले. राना दौड यांनी' धर्म नेसला सोवळे पुन्हा एकदा 'श्री आठवलेची' जीवना मी तुला सोसले जेव्हढे 'श्री नागेश नायडू ची' गुरू द्रोण पक्का दगलबाज आहे' कौशल यांनी राजकारण्यावरील 'शब्दांचे तर पक्के होते' आणि अध्यक्ष श्री व्यंकटेश कुलकर्णीची 'ही न्यारी फकिरी' या गझलांनी रंगत आणली.

यावेळेस परिसरातील गुणीजन रवींद्र लाड, कमलाकर करडे, यादव गुरुजी व पर्यावरण सेवक श्र सूर्यतळ यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. खेडोपाडी, विद्यार्थ्यांत कवितेची गोडी लावणारे कवितेचे घर आणि हिंदी-मराठी गझलकार प्रसिद्धीस आणणे.. नवीन गझल गायक शोधून काढणारे ललित कला फाउंडेशन यांचे हे उपक्रम म्हसळाकरांना आवडला.

यासारखे उपक्रम चिपळूण, दापोली, रत्नागिरी येथे कारणार असल्याचे दिलीप कारखानीस, अध्यक्ष ललित कला फाउंडेशन आणि कार्याध्यक्ष सोमीनाथ सारोलेकर यांनी सांगितले.



**माणगाव : राज्याच्या रोजगार हमी व फलोत्पादन खात्याच्या मंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल भरत गोगावले यांचे उद्योजक विजय मेथा, सुप्रिया शिंदे व सहकारी यांनी अभिनंदन केले.**

# बेशिस्त वाहनचालकांकडून लाखोंचा दंड वसूल

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.२२) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३५९ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून तीन लाख ५२ हजार ३०० रुपये इतका दंड आकारला आहे.

# निजामपूरमध्ये वृद्ध महिलेवर अत्याचारप्रकरणी निषेध मोर्चा

## आरोपीला फाशी देण्याची मोर्चेकऱ्यांची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगांव तालुक्यातील निजामपूर शहरात ८० वर्षीय वृद्ध महिलेवर सुमारे १८ वर्षाच्या तरुणाने अत्याचार केला. याप्रकरणी २० डिसेंबर रोजी माणगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला त्यानंतर माणगांव तालुक्यात या घटनेच्या विरोधात निषेधार्थ पडसाद उमटत आहेत. असाच निषेध मोर्चा निजामपूर शहरात २२ डिसेंबर रोजी काढण्यात आला.

या मोर्चामध्ये निजामपूरमधील महिला भगिनी व त्यांच्या साथीला विविध सामाजिक संघटना आणि समस्त निजामपूर ग्रामस्थ उपस्थित होते. या मोर्चात आरोपिला फाशी द्या कडक कारवाई करा अशा मागणीच्या घोषणा देण्यात आल्या. तसेच 'आजीला न्याय द्या' आरोपीला कठोर शिक्षा करा असा घोषणा देण्यात आल्या. हा मोर्चा पीडित महिला यांच्या घरापासून थेट आय टी आय निजामपूर ते निजामपूर बाजारपेठ-सोमजाई मंदिर निजामपूर श्रीराम मंदिर निजामपूर असा काढण्यात आला.




यामध्ये निजामपूर शहरातील बहुसंख्य महिला वर्ग व विविध समाजाची पुरुष मंडळी देखील उपस्थित होती. या वेळी निजामपूर येथील प्रकरणी प्रशासनाने संबंधित आरोपीविरोधात योग्य ती दखल न घेतल्यास ह्या आंदोलनाचे उग्र स्वरूप माणगाव तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यात दिसून येईल, असे मत या मोर्चा आंदोलनात सहभागी झालेल्या निजामपूरवासीयांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

# कोर्लईमध्ये रताळी लागवडीस सुरुवात

**रेवदंडा : प्रतिनिधी**



आगळ्या वेगळ्या बोलीभाषेतील व विशिष्ट पेहरावातील कोर्लईची माय, आणि कोर्लईमधील रताळी रायगड जिल्ह्यातील तालुक्यातील सर्वच भाजी मार्केटमध्ये हमखास आढळते.

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे पोर्तुगिजाचे वंशज असलेला ख्रिश्चन समाज उपजिवीकेसाठी आर्थिकतेस चालना मिळण्यासाठी बाराही महिने विविध भाज्यांच्या उत्पादने शेतीमधून घेते. यामध्ये प्रामुख्याने हिवाळ्यातील हंगामात साधारतः नोव्हेंबर महिन्यातील वैशिष्टपुर्ण रताळी उत्पन्न खुपच प्रसिध्द असून कोर्लई मधील अवीट गोडी असलेल्या रताळी ग्राहकांच्या व खवय्याच्या खुप मागणीचे असते.

महाशिवरात्रीच्या दिवशी या रताळ्यांना फार मागणी असल्याने कोर्लईची माय कोर्लईच्या रताळीसह तालुक्यातील सर्वच बाजारात रताळी विक्री करताना दिसते. कोर्लईच्या गावठी रताळ्याचे वाण रंगाने लाल चुटूक व खायला गोड असते. रताळे हे आरोग्यवर्धक असून यामध्ये व्हिटॅमिन ए, त्याचप्रमाणे कॅल्शियम, मॅगनीज, व पोटेशियम असल्याने ते गुणकारक मानले जाते. रताळी या पिकाच्या लागवडीसाठी खुप मेहनतीचे व परिश्रमाचे असते. त्यामुळे सर्वच शेतकरी हे पीक घेत नाहीत. दरवर्षी महाशिवरात्रीचे वेळेस रताळे कोर्लई येथून बाजारात होत असतो.

हंगामी पिक म्हणून ओळख असलेल्या रताळी उत्पनासाठी हंगामापुर्वी निवडक व आकर्षक रताळी राखून ठेवली जातात. किमान माध्यम तापमानात ही सर्व रताळी ठेवावी लागतात. पहिल्या पावसात जुन महिन्याच्या सुरूवातीस राखुन ठेवलेल्या रताळयास कोंब फुटतो व कोंब फुटलेली रताळी पावसाच्या हंगामात जमिनीत पुरली जातात. त्यानंतर काही दिवसांनी यांची वेल वाढते, ही वाढलेली वेल इतर ठिकाणी जमीन भुसभुसीत करून त्यावर गाळे तयार करून जमीनीत लावली जाते. या वेलीवरून जमिनीच्या खाली रताळी तयार होतात. तयार झालेली रताळी महाशिवरात्रीचे एक आठवडा आधी काढली जातात. महाशिवरात्रीचे पुर्वी तीन ते चार दिवसात रताळी खरेदी व विक्रीची लाखो रूपयाची उलाढाल बाजारात होत असते.

**खताच्या दरात सुट मिळण्याची मागणी**

कोर्लई परिसरात ख्रिश्चन बांधवानी रताळांची लागवड शंभर टक्के पुर्ण केली आहे. येथील ग्रामस्थ वित्रीन वेगस व जेरॉन पेय यांनी सांगितले की, सर्व शेतकरांची रताळी लागवड पुर्ण झाली आहे. सध्या मजुरीचे व खताचे दर खुपच वाढले आहेत. रताळी उत्पन्न घेणारा शेतकऱ्यांना खताच्या दरात सुट मिळावी तसेच कृषी खात्याकडून बामन कोंडी भागात बंधारा बांधून दिल्यास पाणी पुरवठा मुबलक होईल, या बाबीकडे शेतकऱ्यांनी मागणी केली आहे.

# कोर्लई ख्रिश्चनपाड्यात ख्रिसमसचा उत्साह

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जगाला शांतीचा संदेश देणारा नाताळ सणाला येत्या २५ डिसेंबरला सुरूवात होत असून मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील माउंट कार्मेल चर्च व ख्रिश्चनपाड्यात सलग सात दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

एकूणच कोर्लई मध्ये ख्रिसमस सण मोठया उत्साहाने साजरा करण्यात येत आहे. येत्या २५ डिसेंबर रोजी नाताळ सणास प्रारंभ होत असून ख्रिश्चन बांधव व भगिनी यांनी कोर्लई माउंट कार्मेल चर्च मध्ये येशूच्या जन्मोत्सवाची प्रार्थनेचे आयोजन केले असून सणाला उत्साहात दुपारी कोर्लई चर्च च्या आवारात ख्रिश्चन बांधव व भगिनीसाठी विविध खेळाचे आयोजन करण्यात आले आहे. २६ डिंसेबर रोजी गोशाळा म्हणून प्रसिध्दीस असलेले कार्यक्रमात

## नाताळ सणाची जय्यत तयारी



येशूच्या जन्माचा देखावा स्पर्धा कोर्लई गावात घेण्यात येणार आहे. २७ डिंसेबर रोजी येशूच्या जन्माच्या वेळेला आकाशात तारखा दिसू लागल्या, अश्याच तारखा स्पर्धा घेण्यात येणार आहे.

२८ व २९ रोजी युवकांसाठी संमेलन आयोजीत करण्यात आले आहे. ३० डिसेंबर रोजी कोर्लई ख्रिश्चन पाडयात खेळाचे आयोजन तसेच ३१ डिसेंबर रोजी गतवर्षीच्या २०२४ बद्दल देवाला धन्यवाद प्रार्थनेचे आयोजन तसेच दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी उत्साहामध्ये स्वागत व प्रार्थना तसेच संध्याकाळी गायन व नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. एकूणच २५ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ या कालावधीत कोर्लई ख्रिश्चन पाडा व चर्च परिसरात ख्रिसमस सणाचा धमाका मोठया उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

कोर्लई चर्च व कोर्लई ख्रिश्चनपाडयात नाताळ सणाची जय्यत तयारी सुरू असून चर्च सभोवताली तसेच कोर्लई ख्रिश्चनपाडयात विदयुत रोषनाई, सजावरट गायनाच्या विविध स्तरावर सरावाला सुरूवात झाली आहे अशी माहिती माउंट कार्मेल चर्च कोर्लईचे धर्मगुरू रे.फा. बोनावेंचर नुनीस यांनी दिली.

# दिल्लीचा जयपूरवर रोमहर्षक विजय




**पुणे : प्रतिनिधी**

अटीतटीच्या सामन्यात दबंग दिल्लीने जयपूर संघाला ३३-३१ असे हरविले आणि प्रो कबड्डी लीगमध्ये रोमहर्षक विजय नोंदविला. मध्यंतराला दिल्लीकडे नऊ गुणांची आघाडी होती.

म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत दिल्ली व जयपूर या दोन्ही संघांनी यापूर्वीच प्ले ऑफमध्ये स्थान मिळवले आहे. त्यामुळे साखळी गटात अव्वल स्थान मिळवण्याच्या दृष्टीने दोन्ही संघांमध्ये चुरस होती. दिल्ली संघाने गेल्या तेरा सामन्यांमध्ये विजय मिळवत अपराजित्व कायम ठेवले होते. आजही ही मालिका अखंडित ठेवण्यासाठी ते अव्वल दर्जाचा खेळ करतील अशी अपेक्षा होती. सामन्याच्या सुरुवातीपासूनच दिल्ली संघाने आघाडी घेऊन ती कायम ठेवण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला. पंधराव्या मिनिटाला त्यांच्याकडे १७-१२ अशी आघाडी होती. त्यांचा चढाईपटू आशु मलिक याने या स्पर्धेच्या इतिहासातील सातशे गुणांचा टप्पा ओलांडला. मध्यंतराला दिल्ली संघाने २१-१२ अशी आघाडी घेतली होती.

उत्तरार्धातही दिल्ली संघाने आपली पकड कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. सामन्याच्या २५ व्या मिनिटाला त्यांच्याकडे सहा गुणांची आघाडी होती. शेवटची दहा मिनिटे बाकी असताना त्यांच्याकडे पाच गुणांचे अधिक्य होते. जयपूरच्या खेळाडूंनी जिद्दीने लढत देत ही आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला. सहा मिनिटे बाकी असताना लोण नोंदवण्याची जयपूरला संधी मिळाली. त्याचा फायदा घेत त्यांनी लोण नोंदवत २७-२७ अशी बरोबरी साधली. या बरोबरीमुळे सामन्यातील उत्सुकता वाढली, पण सरतेशेवटी दिल्लीने दोन गुणांनी बाजी मारली.

दिल्ली संघाकडून कर्णधार अशू मलिक व नवीन कुमार यांनी सुरेख चढाया केल्या जयपुर संघाकडून अर्जुन देशवाल व अभिजीत मलिक यांनी पल्लेदार चढाया केल्या.



# पनवेलच्या विचुंबेत रंगली कुस्ती स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विचुंबे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आणि पनवेल तालुका कुस्तीगीर असोसिएशनचे अध्यक्ष बळीराम पाटील यांचा वाढदिवस रविवारी (दि. २२) उत्साहात साजरा झाला. वाढदिसाचे औचित्य साधून नवतेज व्यायामशाळेच्या सौजन्याने पनवेल तालुका कुस्ती चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच स्पर्धेसाठी खेळाडूंना प्रोत्साहित केले.

या वेळी भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, ग्रामपंचायत सदस्य अनंता गायकवाड, अनंता भोईर, विचुंबे विभागीय अध्यक्ष के.सी.पाटील, वाजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजा भोईर, आकाश पाटील, किशोर सुरते, माजी उपसरपंच गुरूनाथ म्हात्रे, पळस्पेचे माजी उपपसपरंच अजय तेजे, श्याम पाटील, किरण दरे, सजीत भिंगारकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कुस्तीप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.



विद्यालयाच्या भव्य क्रीडांगणावर दोन दिवस स्पर्धा रंगल्या. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व भाजपचे पनवेल तालुका संघटक प्रभाकर जोशी, भाजप खारघर शहर उपाध्यक्ष सचिन वास्कर तसेच उच्च माध्यमिक विभागाच्या प्राचार्य निशा नायर, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य झिरपे, माध्यमिक विभागाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतरवर्ग उपस्थित होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा शिक्षक संभाजी जाधव यांनी केले. या वर्षी रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी व पनवेल महापालिका आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हा व मुंबई विभागस्तरावर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये एकूण १०५ पदके जिंकली असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

या वेळी प्रभाकर जोशी यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली व या वर्षी झालेल्या जिल्हास्तरीय, विभागस्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमार्फत क्रीडांगणावर क्रीडाज्योतीचे संचलन करून कार्यक्रमस्थळी अखंडपणे प्रज्वलित ठेवण्यात आली. जोशी यांच्याच हस्ते श्रीफळ वाढविण्यात आला तसेच क्लॅपर वाजवून धावणे या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

या क्रीडा स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक खेळांचा समावेश होता. यामध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान पदक व चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धांचे नियोजन विद्यालयाचे क्रीडा शिक्षक संभाजी जाधव, उच्च माध्यमिक विभागाचे क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, अभिजित जोगदंडे, स्वप्नाली पवार यांनी केले. या स्पर्धेसाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले.

